


# दैनिक चालु वार्ता





✻ पुणे ✻ वर्ष : ५ ✻ मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील ✻ अंक : ५७ ✻ मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ ✻ पाने : ०४ ✻ किंमत रु.३ ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895
✻ Chief Editor : D.S.Lokhande Patil ✻ Pune ✻ Vol 5 ✻ Issue 57 ✻ Tuesday ✻ 23 September 2025 ✻ Pages 04 ✻ Price Rs.3 ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895 ✻ E-mail : dainikchaluwartha@gmail.com
✻ पुणे ✻ नांदेड ✻ छ.संभाजीनगर ✻ बीड ✻ परभणी ✻ हिंगोळी ✻ जालना ✻ लातूर ✻ धाराशिव ✻ मुंबई ✻ पालघर ✻ ठाणे ✻ रायगड ✻ रत्नागिरी ✻ अहमदनगर ✻ सोलापूर ✻ सातारा ✻ अमरावती ✻ यवतमाळ ✻ वर्धा ✻ वाशिम ✻ चंद्रपूर ✻

# नवरात्रौत्सवात दंगली झाल्यास शासन जबाबदार...

## प्रवीण तोगडियांचा इशारा; इतर धर्मियांना गरब्यात येण्याला विरोध !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** नवरात्रोत्सवातील गरब्यावरुन नवा राजकीय वाद पेटण्याची शक्यता आहे. नवरात्रौत्सवात गरबा खेळण्यासाठी केवळ हिंदूनाच प्रवेश देण्यात यावा, अशी स्पष्ट भूमिका विश्व हिंदू परिषदेने मांडली आहे. त्यानंतर आता नवरात्रौत्सवात हिंदूनाच मंदिरात व गरब्यात प्रवेश द्यावा, इतर धर्मियांना प्रवेश नको, असं मत आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे संस्थापक डॉ. प्रवीण तोगडिया यांनी मांडली आहे. 'आम्ही इतर धर्मियांच्या प्रार्थनास्थळी जात नाही, मग ते आमच्या धार्मिक कार्यक्रमात का यावेत? यामुळे कुठल्याही प्रकारचा आक्षेपार्ह प्रकार घडल्यास दंगली भडकू शकतात आणि त्याची जबाबदारी शासन-प्रशासनावर राहील,' असा इशाराही प्रवीण तोगडिया यांनी दिला. गंगापूर रोडवरील रावसाहेब थोरात सभागृहात रविवारी हिंदू हुंकार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत बोलताना प्रवीण तोगडिया यांनी आपली भूमिका मांडली. नवरात्रौत्सवात 'वीर हिंदू-विजेता हिंदू' अभियान देशभर राबवले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद आणि राष्ट्रीय बजरंग दलातर्फे या अभियानाअंतर्गत विजयादशमीच्या दिवशी प्रत्येक मंदिरात शस्त्रपूजन



करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. 'ज्या ठिकाणी देवीसमोर गरबा साजरा केला जातो, तिथे शस्त्रपूजन करण्यात यावे,' असेही प्रवीण तोगडिया यांनी स्पष्ट केले.

तसेच अतिवृष्टीमुळे शेतकरी आत्महत्या करण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी. यासोबतच दर शनिवारी प्रत्येक मंदिरात हनुमान चालीसाचे पठण करण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच आगामी सिंहस्थात आम्ही आमचे योगदान देणार असून साधु महंतांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा देण्यासाठी त्वरित प्रयत्न करावा, अशी मागणीही त्यांनी केली. राज्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या म्हणजे संभाव्य आत्महत्या टळतील, असा सल्ला त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला.

**शनिवारी हनुमान चालिसा, घरोघरी त्रिशूल वाटप...**

हिंदूंचे संघटन होण्यासाठी दर शनिवारी हनुमान मंदिरांमध्ये एकत्र येत हनुमान चालीसाचे पठण करा, त्यासाठी कॉलनीतील हिंदूंना एकत्र करा, असे आवाहनही त्यांनी केले. यासोबत नवरात्रीमध्ये शस्त्रपूजनासाठी परिषदेच्या वतीने त्रिशूल वाटणार असल्याचे डॉ. तोगडिया यांनी जाहीर केले. हिंदूंची लोकसंख्या कमी होणे संकटाला आमंत्रण देण्यासारखे आहे. त्यामुळे प्रत्येक घरात किमान तीन मुलांना जन्म घालणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

# जनाब आपल्या पायाखाली काय जळते ते पाहा...

## अमेरिकेची चाल; भारताभोवती तयार होतोय धोकादायक त्रिकोण !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** गेल्या आठवड्यात अनेक विषय आणि अनेक चिंता मनाशी होत्या. अमेरिकी आयात शुल्काचा हल्ला होताच. अमलीपदार्थ निर्मिती, विक्री आणि व्यापारासाठी ज्या देशांच्या भूमीचा वापर केला जातो अशा देशांच्या यादीत भारताचे नाव टाकले गेल्याची बातमी आली. शिवाय असेही कळले, की अमेरिकेचे सुमारे १२० सैनिक गुपचूप बांगलादेशमध्ये पोहोचले आहेत. बांगलादेशातील मार्टिन बेटावर सैनिकी तळ उभारण्यात अमेरिकेला यश येईल? भारताचा मित्र असलेल्या सौदी अरेबियाने पाकिस्तानबरोबर संरक्षणविषयक करार का केला असेल? आज या सगळ्याचा आढावा आणि सगळ्यात शेवटी क्रिकेट.

अमेरिकेच्या व्हाइट हाउसने अमलीपदार्थांच्या व्यापारात या ना त्या प्रकारे संबंध असलेल्या २३ देशांची एक यादी अमेरिकी संसदेकडे पाठवली आहे. त्या यादीत पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्तान-बरोबर भारताचेही नाव आहे. भारत स्वतःच अमलीपदार्थांच्या



आंतरराष्ट्रीय तस्करीशी झुंजत असताना हे घडले आहे. चहूदिशांनी भारतात अमलीपदार्थ पाठवले जात असताना त्यांच्या व्यापारात आपलीच भूमिका कशी असू शकेल? व्हाइट हाउसची एक चलाखी अशी, की अमलीपदार्थांविरुद्ध भारत देत असलेल्या कठोर लढ्याची प्रशंसाही केली आहे. भारतात अमलीपदार्थांविषयी कठोर धोरणे आहेत असे म्हणता तर यादीत भारताचे नाव कसे काय? अमेरिकेच्या राष्ट्रपतींना एखाद्या विशेष कायद्याद्वारे काही कारवाई करावयाची असेल तर अशा प्रकारचे अहवाल तयार केले जातात.

भारताचे नाव यादीत टाकले याचा अर्थ भारताविरुद्ध मोठे षडयंत्र रचले जात आहे. अमेरिका आपल्या पायाखाली काय जळते आहे हे पाहत नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. न्यू यॉर्कसारख्या शहरात खुलेआम अमलीपदार्थांची विक्री होते. अमेरिकेच्या २२ राज्यात मारिजुआनाची विक्री आणि सेवन दोन्ही वैध आहेत. कॅनडा आणि मेक्सिकोची गोष्ट तर सोडूनच द्या, जिथे अमलीपदार्थांचा कारभार फळतो फुलतो आहे. अमेरिकेचे १२० सैनिक अचानक बांगलादेशमध्ये पोहोचले; त्यांनी गुपचूप चितगावच्या एका हॉटेलमध्ये गुप्तपणे मुक्काम केला. परंतु त्या गुप्तहेरांचे भले होईल ज्यांनी ही बातमी जगाला सांगितली! त्यानंतर अमेरिका आणि बांगलादेशने खुलासा केला, की अमेरिकन सैनिक संयुक्त सैन्य अभ्यास आणि बांगलादेशच्या सैन्याला प्रशिक्षण देण्यासाठी आले आहेत. असे असेल तर इतकी गुप्तता का पाळली गेली?

बऱ्याच दिवसांपासून अमेरिका बांगलादेशमधील सेंट मार्टिन बेटावर सैन्यतळ उभारण्याच्या प्रयत्नात आहे. सेंट मार्टिन बेटाला नारिकेल जिंजीला म्हणजेच नारळ बेट आणि दारूचिनी म्हणजे दालचिनी बेट या नावानेही ओळखले जाते. या बेटावरून भारत, म्यानमार आणि चीनवर लक्ष ठेवणे अमेरिकेला सहज शक्य होईल. शेख हसीना यांच्या सरकारवर यासाठीच अमेरिकेने मोठा दबाव टाकला होता. परंतु त्यांनी ऐकले नाही. त्यांचे राज्य उलथवण्याच्या मागे हेही एक कारण होते म्हणतात. मोहम्मद यूनुस अमेरिकेच्या मांडीवर खेळत असतात; बरोबर पाकिस्तानही आहे. याचा अर्थ एक अत्यंत धोकादायक त्रिकोण तयार झाला आहे. मार्टिन बेट अमेरिकेला मिळावे यासाठी गुपचूप प्रयत्न होत आहेत. तसे झाल्यास अमेरिका आपल्या छाताडावर येऊन बसेल.

सौदी अरेबिया आणि पाकिस्तान या दोन्ही देशात एक संरक्षणविषयक

(पान २ वर...☞)

# परदेशात जाण्याऐवजी...

## योगी आदित्यनाथ यांचा तरुणांना सल्ला पंतप्रधानांच्या संकल्पांना रोजच्या जीवनाचा भाग बनवा !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी गोरखपूर येथील महायोगी गोरखनाथ विद्यापीठात 'विकसित भारत - विकसित उत्तर प्रदेश व्हिजन-२०४७' या कार्यशाळेत सहभाग घेतला. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२७ पर्यंत विकसित भारत घडवण्याचे जे उद्दिष्ट ठेवले आहे, त्यानुसार उत्तर प्रदेश सरकार काम करत आहे.

त्यांनी सांगितले की, गेल्या नऊ वर्षांत उत्तर प्रदेशातील प्रति व्यक्ती उत्पन्न आणि राज्याच्या एकूण देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) तिप्पट वाढ झाली आहे. विकासाची ही गती प्रत्येक क्षेत्रात पाहायला मिळत आहे. सरकारने जारी केलेला क्यूआर कोड प्रत्येक नागरिकाने आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करून, राज्याच्या विकासासाठी आपले मौल्यवान सूचना पाठवून द्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.



**उत्तर प्रदेशच्या आर्थिक प्रगतीचा वेध**

मुख्यमंत्री म्हणाले की, १९४७ मध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेत उत्तर प्रदेशचा वाटा १४ टक्के होता, जो नंतर कमी होत गेला. २०१७ पर्यंत राज्याची जीडीपी १२ लाख ३६ हजार कोटी रुपये होती. या वर्षाच्या अखेरपर्यंत ती ३६ लाख कोटी रुपयांवर पोहोचेल, म्हणजेच नऊ वर्षांत तिप्पट वाढ. त्याचप्रमाणे, राज्यातील प्रति व्यक्ती उत्पन्नही नऊ वर्षांत ४५ हजार रुपयांवरून १ लाख २० हजार रुपयांपर्यंत पोहोचत आहे.

विकसित भारत घडवायचा असेल, तर सर्वात आधी उत्तर प्रदेश विकसित करणे आवश्यक आहे. हे देशाचे हृदयस्थान आहे आणि देशातील सर्वाधिक लोकसंख्या येथे राहते. राज्यातील प्रत्येक गाव, शहर आणि वस्तीचा विकास झाला पाहिजे,' असेही ते म्हणाले.

**पंचप्रण आणि नऊ संकल्पांचे महत्त्व**

पंतप्रधान मोदींनी भारताच्या अमृतमहोत्सवी वर्षात २०४७ पर्यंत विकसित भारतासाठी 'पंचप्रण' दिले आहेत, ज्यानुसार आपण सर्वांनी पुढे जायला हवे, असे मुख्यमंत्री म्हणाले. त्यांनी हे संकल्प रोजच्या जीवनाचा भाग बनवण्याचे आवाहन केले.

**पाच महत्त्वाचे संकल्प:**

जलसंधारण: पाण्याचा योग्य वापर आणि साठा करण्याचे धोरण.

पर्यावरण संरक्षण: पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, प्रत्येकाने आईच्या नावाने एक झाड लावावे.

स्वच्छता: स्वच्छतेमुळेच पूर्वीच्या तुलनेत पूर्वांचलमध्ये एन्सेफलायटिससारख्या रोगांचा प्रसार थांबला आहे.

आत्मनिर्भरता: 'स्वदेशी' आणि 'लोकल फॉर व्होकल' (स्थानिक

(पान २ वर...☞)

# आता रिकामं ठेवू नका, काहीतरी काम द्या...

## धनंजय मुंडेंची सुनील तटकरेंकडे मागणी; भर मंचावर काय घडलं ?

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे काही महत्वाची जबाबदारी द्या, अशी मागणी केली आहे. रायगडमधील एका कार्यक्रमात धनंजय मुंडे यांनी ही मागणी केली.

सुनील तटकरेंनी आम्हाला कायम मार्गदर्शन करत राहावं. चुकले तर कान धरावा...नाही चुकलं तर चालतं का?...पण आता रिकामं ठेवू नका...काहीतरी जबाबदारी द्या...अशी मागणी धनंजय मुंडे यांनी भर मंचावरुन केली. धनंजय मुंडेंच्या या विधानाची सध्या राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा आहे. यावर



सुनील तटकरेंनी दिली प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय मुंडेंनी काहीतरी काम द्या, अशी मागणी केलीय. वरिष्ठ याबाबत योग्य निर्णय घेतील, असं सुनील तटकरे म्हणाले.

**सुनील तटकरे कोकणाचा विकासपुरुष- धनंजय मुंडे**

मला वडिलांचा आधार सुनील तटकरे यांनी दिला. सुनिल तटकरे यांनी अनेक दिग्गज नेत्यांपासून घनिष्ठ सबंध ठेवले. महाराष्ट्राच्या मातीत काय चालले आहे? त्यामधील जाणणारे सुनील तटकरे आहेत. कोकणाचा विकासपुरुष म्हणून सुनील तटकरे यांच्याकडे पाहिले जाते. सुनील तटकरे यांना कागद लागत नाही. मात्र महाराष्ट्रात काय सुरू आहे हे जाणणारे ते आहेत. त्यांचे वय आमच्यापेक्षा अजून तरुण आहे. मी सुनील तटकरे यांच्यामुळे उभा आहे, असंही धनंजय मुंडे यावेळी म्हणाले.

**पक्षाला उंचीवर नेण्याचे काम सुनील तटकरेंनी केले - धनंजय मुंडे**

कोकणचे विकास पुरुष म्हणून दमदार कामगिरी करणाऱ्या सुनील तटकरेंनी पक्ष नेतृत्वात देखील आपल्या कार्याचा एक वेगळा ठसा निर्माण करत प्रेरणादायी वाटचाल आजवर केली आहे. माझ्या राजकीय व सामाजिक जडणघडणीत देखील तटकरे साहेबांची वडिलकीची साथ व भक्कम पाठबळ मला लाभले आहे. देशाच्या संसदेत काम करताना देश हिताला ज्या प्रमाणे सर्वोच्च प्राधान्य देऊन सुनील तटकरेंनी आजवर काम केले, त्याच हिरीरीने आणि विश्वासाने पक्षात देखील नवतरुण चेहऱ्यांना संधी देत पक्षाला देखील एका उंचीवर नेण्याचे काम सुनील

(पान २ वर...☞)

# मोठा धमाका होणार !

## आठवडाभर थांबा; रोहित पवार, सुषमा अंधारेंना अंजली दमानियांचा सूचक इशारा...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या भाजपला स्वॉफ्ट कॉर्नर देतात, असा आरोप सुषमा अंधारे यांनी केला होता. त्यावरून आमदार रोहित पवार यांनी देखील दमानिया यांच्या हेतू बद्दल कुठलीही शंका नाही परंतु त्यांच्या भूमिका सिलेक्टिव्ह असतात याबद्दल मात्र प्रचंड चर्चा आहेत, असे म्हणत त्यांना तीन प्रश्न विचारले.

**ज्यात भाजपशी निगडीत त्यांच्या भ्रष्टाचार, घोटाळ्याबाबत घेतली नाही.**

पवार, अंधारे यांच्या आरोपानंतर दमानिय यांनी 'सध्या मी एका खूप मोठ्या विषयावर काम करत आहे. त्यामुळे मी रोहित पवार, सुषमा अंधारे यांना विनंती करते की एक आठवडा थांबा. तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मी देईन. पण सध्या माझ्याकडे वेळ



खरच खूप कमी आहे.', असे प्रत्युत्तर दिले आहे. त्यामुळे आठवडाभरात दमानिया या मोठा घोटाळा बाहेर काढणार अशी चर्चा सुरूआहे.

तसेच दमानिया यांनी ट्विट करत, 'महाराष्ट्राच्या दोन विद्वान नेत्यांना माझे आदरपूर्वक उत्तर, असे म्हणत माझ्या कृतींबद्दलच्या त्यांच्या समजुतींबद्दल, किंवा माझ्या हेतूंबद्दलच्या त्यांच्या गृहीतकांबद्दल, त्यांच्याशी वाद घालून उपयोग नाही. जे योग्य आहे ते करण्याचे प्रयत्न करावे आणि पुढे जावे.', असे देखील म्हटले आहे. तसेच आणि हो, या दोन्ही नेत्यांनी कुठचाच विषय, ना कधी लावून धरला, ना कधी तडीस नेला, असा टोला देखील लगावला

**सुषमा अंधारे नेमकं काय म्हणाल्या?**

अंजली दमानिया या व्यक्तिरेखे बद्दल मला कायमच कुतूहल वाटत राहतं. चंद्रशेखर बावनकुळे आणि मेघा इंजीनियरिंग कंपनी याच्या संबंधाने प्रचंड जोरात चर्चा सुरू झाली. ज्या मेघा इंजीनियरिंग कंपनीला नियमबाह्य पद्धतीने कंत्राट देण्यावरून मा. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला खडे बोल सुनावले मात्र दमानियांनी बावन्नकुळेचा ब सुद्धा उच्चारला नाही. पण याच दमानिया काल जयंत पाटील यांच्याबद्दल वापरलेल्या अत्यंत विषारी भाषेबद्दल चकार शब्दाने व्यक्त झाल्या नाहीत. मात्र आ. रोहित पवारांनी आपल्या मतदारसंघात निकृष्ट दर्जाचे काम झाले यावर जाब विचारला की लगेच त्या मैदानात उतरल्या... म्हणजे भाजपचे वक्ते त्यांची शिवराळ भाषा, भाजपच्या मंत्र्यांचे भ्रष्टाचार दिसत नाहीत आणि पवार किंवा ठाकरे आडनाव समोर असले की लढण्याची एकदम शिरशिरी येते. फारच अनाकलनीय गूढ आहे बाबा.

**रोहित पवार यांनी विचारले तीन प्रश्न**

रोहित पवार यांनी तीन प्रश्न मांडत त्यावर अंजली दमानिया यांनी भूमिका मांडून गैरसमज दूर करावेत असे आवाहन केले आहे.

- राज्यातल्या शेतकरी

(पान २ वर...☞)

### तापमान

दिवस : 29° उच्च
रात्र : 22° किमान

सूर्योदय : १२ तास ०९ मिनिटे
उगवणे : 06:23 AM
मावळणे : 06:32 PM
सूर्यास्त : १२ तास २७ मिनिटे
उगवणे : 05:48 AM
मावळणे : 06:15 PM

**LIVE**

24k सोने प्रति १० ग्रॅम रू. १,१२,१५०/-
22k सोने प्रति १० ग्रॅम रू. १,०२,८००/-

चांदी प्रति किलो रू. १,३५,०००/-
डॉलर प्रति दर रू.८८.१०
पेट्रोल : रू. १०३.५०/-
डिझेल : रू. ९०.०३/-



# मेट्रोचे सर्व टप्पे २०२६ च्या अखेरपर्यंत प्रवाशांकरिता खुले होतील -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे ग्रामीण - प्रतिनिधी
विकी जाधव



## ठाण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावेल -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### मेट्रो मार्ग-४ व ४ अ, टप्पा-१, गायमुख ते विजय गार्डन स्टेशन पर्यंत मेट्रोची तांत्रिक तपासणी व चाचणी संपन्न

**ठाणे :** मेट्रो ४ आणि मेट्रो ४ अ या मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सला जोडणाऱ्या मेट्रो ११ या मार्गिकेला जोडण्यात येणार असल्याने ही ५८ किमी लांबीची देशातील सर्वात मोठी मेट्रो मार्गिका ठाणेकर आणि मुंबईकरांसाठी उपलब्ध होणार आहे. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मेट्रो मार्ग ४ (वडाळा-कासारवडवली) व ४ अ (कासारवडवली-गायमुख) च्या टप्पा-१ गायमुख जंक्शन गायमुख गाव- घोडबंदर रोड-कासारवडवली- विजय गार्डन या मार्गिकेच्या प्राधान्य विभागावर तांत्रिक तपासणी व ट्रायल रनची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अध्यक्ष एकनाथ शिंदे, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार रवींद्र फाटक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मेट्रो मार्ग ४ आणि ४ अ बद्दल माहिती देताना म्हणाले की, घाटकोपर-मुलुंड -गायमुख या मेट्रो मार्गिकेची एकूण लांबी ३५ किलोमीटर असून मेट्रो ४ ची ३२ कि.मी. आणि मेट्रो ४ अ ची २.८८ कि.मी. आहे. मार्गिकेत एकूण ३२ स्थानके असून या प्रकल्पासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मेट्रो ४, मेट्रो ४ अ, मेट्रो १० आणि मेट्रो ११ या सर्व मेट्रोसाठी डेपो तयार करण्याकरिता भोगरपाडा येथे ४५ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या मेट्रो मार्गिकेचा विशेष फायदा असा आहे की, पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, मुंबई शहर आणि ठाणे शहर या सर्व मार्गांना जोडणारा हा मार्ग असणार आहे. पुढे ही मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी टर्मिनसला जोडणाऱ्या मेट्रो ११ ला जाडली जाणार आहे. त्यामुळे ही ५८ किमी लांबीची देशातील सगळ्यात मोठी मेट्रो मार्गिका निर्माण होणार आहे. या मेट्रोच्या सर्व मार्गिका सुरु झाल्यावर यामध्ये १३ लाखापेक्षा जास्त दैनंदीन प्रवासी प्रवास करतील. या मेट्रोमुळे रस्त्यावरची वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी होईल. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे टप्प्याटप्प्याने सर्व टप्पे प्रवशांकरिता खुले झाले पाहिजेत असा प्रयत्न आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

# कर्णकर्कश सायलेन्सर चा वापर दुचाकी चालकांवर कारवाईचा बडगा

## पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईचे नागरिकांतून स्वागत

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मोहोळ - प्रतिनिधी
बापू घळके



**मोहोळ :** मोहोळ शहरातील वाढत्या कर्णकर्कश सायलेन्सरच्या आवाजाला आळा घालण्यासाठी मोहोळ पोलिसांनी धडक कारवाई सुरूकेली आहे. पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने जवळपास १४ दुचाकी चालकांवर दंडात्मक कारवाई करत त्यांना त्यांच्या मोटारसायकलला कंपनीचे मूळ सायलेन्सर बसवून त्यांना समज देऊन सोडून दिले.

गेल्या काही दिवसांपासून मोहोळ शहरात रात्री-अपरात्री दुचाकी चालकांकडून कर्णकर्कश आवाजाचा सायलेन्सर वापरला जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत होत्या. बंदुकीतून गोळी सुटल्याप्रमाणे किंवा फटाके फुटल्याप्रमाणे येणाऱ्या या आवाजामुळे नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत होता. भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहने आणि त्यातून येणारा हा आवाज यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. या वाढत्या तक्रारींची दखल घेत, मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी स्वतः या कारवाईसाठी विशेष लक्ष दिले. शहरातील विविध ठिकाणी अचानकपणे कारवाई करत पोलिसांनी १४ दुचाकी चालकांना रंगेहाथ पकडले. त्यांच्या दुचाकीसह त्यांना पोलिस ठाण्यात आणण्यात आले. पोलिसांसमोरच त्यांच्या वाहनांवरील अनधिकृत, कर्णकर्कश सायलेन्सर जेवढे होते तेवढे काढून टाकण्यात आले आणि ज्यांनी काही मुळ कंपनीचे सायलेन्सर काढून टाकले होते त्यांना त्या जागी कंपनीने दिलेले मूळ सायलेन्सर बसवण्यात आले. भविष्यात अशाप्रकारे आवाजाचे प्रदूषण करणार नाही, अशी समज देऊन त्यांना सोडून देण्यात आले.

या कारवाईमुळे शहरातील कर्णकर्कश आवाजाला काही प्रमाणात आळा बसेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली असून, त्यांनी पोलिसांच्या या मोहिमेचे जोरदार स्वागत केले आहे. पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी या वेळी आवाहन केले आहे की, शहरातील कोणत्याही वाहनांवर कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर वापरू नयेत, तसेच फॅन्सी नंबर प्लेटचा वापरही टाळावा. यापुढेही अशा प्रकारच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे संकेत त्यांनी दिले आहेत.

# चिंचोली येथील पालखी विसावा स्थळाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी - सोमनाथ काळे



**देहू :** संत तुकाराम महाराज पंढरपूर वारी दरम्यान पारंपरिक दुसऱ्या विसाव्यासाठी वापरल्या जाणा?्या चिंचोली येथील पालखी विसावा स्थळाच्या विकासाची मागणी जोर धरू लागली आहे. देहू-देहूरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीतील या स्थळाची अवस्था दयनीय असून, येथील झुडपे, खड्डे, चढ-उतार यामुळे आणि पावसाळ्यात गाळ साचल्याने वारकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र देहू-देहूरोड पंचक्रोशी ग्रामस्थ कृती समितीच्या शिष्टमंडळाने शनिवार (ता.२०) रोजी काळेवाडी येथे झालेल्या जनसंवाद कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी बाळासाहेब जाधव, रमेश जाधव, संजय सावंत, नंदकुमार काळोखे यांनी प्रतिनिधित्व करत पालखी विसावा स्थळाच्या विकासासाठीचे निवेदन पवार यांना सादर केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या निवेदनाची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, 'तत्काळ पुणे जिल्हाधिकारी यांना याबाबत सूचित करण्यात येईल,' असे आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले.

चिंचोली येथील संत तुकाराम महाराज पादुका मंदिर हे प्राचीन वास्तू असून, आषाढी वारीतील पालखी येथे विसावल्यानंतर हजारो वारकरी याच परिसरातील विस्तीर्ण गायरणात थांबतात आणि भोजनादी व्यवस्था करतात. त्यामुळे या परिसराचा योग्य प्रकारे विकास करून सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे ठरत आहे. सदर मागणीसाठी देहू देवस्थान संस्थानसह स्थानिक ग्रामस्थ, वारकरी भाविक यांनीही पाठिंबा दर्शवला असून, यासंदर्भातील निवेदन मावळचे आमदार सुनील शेळके तसेच पुणे जिल्हाधिकारी यांनाही सादर करण्यात आले आहे. या कामाची अंमलबजावणी २०२६ साली होणाऱ्या आषाढी वारीच्या आधी पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# पत्रकारांवर हल्ल्याचा निषेधः तहसीलदारांना निवेदन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जव्हार - प्रतिनिधी
दिपक काकरा




पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेध करून असे हल्ले हे लोकशाहीला घातक असून पत्रकार हा सत्यघटना समाजासमोर मांडत असल्याने तो लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानला जातो.
संदीप साळवे, अध्यक्ष, जव्हार तालुका पत्रकार संघ.

**जव्हार :** नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथे वार्तांकनासाठी गेलेल्या झी २४ तासचे ब्यूरो चीफ योगेश खरे, साम टीव्हीचे ब्यूरो चीफ अभिजीत सोनवणे आणि पुढारी न्युजचे ब्युरो चीफ किरण ताजणे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करत जव्हार तालुका पत्रकार संघाने जव्हार तहसीलदारांना निवेदन देत निषेध व्यक्त केला. पत्रकारांवर झालेल्या या भ्याड हल्ल्यात पत्रकार गंभीर जखमी झाले होते. पत्रकारांवरील हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर कठोर कारवाई करून पत्रकारांना सुरक्षित वातावरण मिळावे अशी मागणी जव्हार पत्रकार संघटनेकडून करण्यात आली.पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना आखण्यात येऊन यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत.

**कारवाईची मागणी**

पत्रकारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यावेळी एकजुटीने लढा देण्याचा निर्धारही जव्हार पत्रकार संघटनेकडून करण्यात आला. पत्रकारांचे कार्य हे सुरक्षित वातावरणात पार पडावे यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणीही निवेदनाच्या माध्यमातून शासनाकडे करण्यात आली आहे. पत्रकार हा लोकशाहीतील एक महत्त्वाचा धागा असून समाजाचे डोळे व नाक आहेत ते सत्य घटना जनतेसमोर आणण्याचे काम करीत असून अशावेळी पत्रकारांच्या कार्यात अडथळा आणणे व जीविताला धोका निर्माण करणे ही लोकशाहीला घातक बाब आहे.

मागील काही काळात वारंवार होणाऱ्या पत्रकारांवर हल्ल्याच्या घटना दुर्दैवी असून प्रशासनाने याबाबत गंभीर पावले उचलणे आवश्यक असल्याचे जव्हार पत्रकार संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी जव्हार तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप साळवे, सचिव मनोज कामडी सह जव्हार तालुक्यातील पत्रकार बंधूंच्या उपस्थितीत या हल्ल्याचा निषेध करून जव्हार तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.

# शिऊर बंगला येथे टर्नवर खड्ड्याचा थैमान

## वाहनधारकांचा जीव टांगणीला, अपघाताची शक्यता प्रचंड!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी
मोहन आखाडे



रस्त्याच्या मध्यभागी असल्याने समोरून येणारी गाडी व हा खड्डा यात वाहनचालक गोंधळून

**शिऊर :** (ता. वैजापूर) परिसरातील शिऊर बंगला येथे मुख्य रस्त्याच्या टर्नवर प्रचंड खड्डा निर्माण झाला असून या खड्ड्यामुळे प्रवाशांचा जीव अक्षरशः धोक्यात आला आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या खड्ड्यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हा टर्न म्हणजेच अपघाताचा हॉटस्पॉट बनला असून मोटारसायकलस्वार, चारचाकी चालक, ट्रॅक्टर-टेम्पोचालक यांना सतत अपघाताचा धोका जाणवत आहे. विशेष म्हणजे रस्त्यावरील गर्दी व वर्दळ लक्षात घेता हा खड्डा कधी कोणाच्या जीवावर उठेल हे सांगता येत नाही.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून हा खड्डा झपाट्याने वाढत आहे. जातो. त्यामुळे दोन चाकी चालक घसरून पडणे, वाहनांचे टायर फुटणे, गाड्यांचे ॲक्सिडेंट होणे यासारख्या घटना घडण्याची शक्यता अधिकच वाढली आहे.

विशेष म्हणजे, हा रस्ता तालुक्यातील महत्वाच्या मार्गांपैकी एक असून शेतकरी, कामगार, व्यापारी यांची नेहमीची मोठ्या प्रमाणात ये-जा येथे होते. या धोकादायक खड्ड्यामुळे लोकांमध्ये संतापाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रात्रीच्या वेळी तर परिस्थिती अधिक गंभीर होते. अंधारात वाहनांचे दिवे लागूनही हा खड्डा स्पष्ट दिसत नाही. अचानक समोर आलेल्या खड्ड्यामुळे चालक गाडीवरील नियंत्रण गमावतात. यामुळे एखादा गंभीर अपघात होणे अपरिहार्य ठरूशकते.

स्थानिक नागरिकांचा एकच सवाल

अपघात झाल्यानंतरच जागे होणार का प्रशासन?

(पान १ वरून...)

## परदेशात जाण्याऐवजी...

उत्पादनांचा वापर) याला प्रोत्साहन देणे.

भारतातच पर्यटन: परदेशात जाण्याऐवजी देशातील धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देणे. आपल्या देशात चार धाम, ५१ शक्तिपीठे आणि १२ ज्योतिर्लिंगांसारखी अनेक ठिकाणे आहेत. यामुळे आपला पैसा देशातच राहील आणि अर्थव्यवस्थेलाही बळ मिळेल.

याशिवाय, त्यांनी नैसर्गिक शेतीलाही प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. रासायनिक खतांमुळे वाढणाऱ्या कर्करोग आणि मधुमेहासारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नैसर्गिक शेती फायदेशीर आहे, असे त्यांनी सांगितले.

(पान १ वरून...)

## जनाब आपल्या पायाखाली काय जळते ते पाहा...

करार झाला आहे. जर एखाद्या देशावर हल्ला झाला तर तो दोन्ही देशांवर हल्ला मानला जाईल असा त्याचा सोप्या शब्दांत अर्थ निघतो. सौदी अरेबियाबरोबर भारताचे अत्यंत घनिष्ठ संबंध असताना तो देश पाकिस्तानबरोबर का गेला? भविष्यात जर भारत-पाकिस्तान युद्ध झाले तर सौदी अरेबिया भारताच्या विरुद्ध उभा राहील? - तसे वाटत तर नाही. पाकिस्तान आणि सौदी अरेबियात खूप जुना लष्करी संबंध आहे. १९९८ मध्ये पाकिस्तानने अणुपरीक्षण केले तेव्हा सौदी अरेबियाचे तत्कालीन संरक्षणमंत्री सुल्तान उत्तान दिन अब्दुल अजीज अल सऊद पाकिस्तानला गेले होते. अणुचाचणीच्या ठिकाणांपासून क्षेपणास्त्रांपर्यंत त्यांना नेले गेले. साधारणतः कोणताही देश कुठल्या विदेशी व्यक्तीला आपली अणुभट्टी कोठे आहे हे दाखवत नाही. अणुपरीक्षणासाठी सौदी अरेबियाने पैसा दिला होता का? असा प्रश्न त्यामुळेच तेव्हा निर्माण झाला होता. आता नव्या करारातून पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून खूप पैसे मिळतील हे नक्की. त्याचा उपयोग भारताच्या विरुद्ध होऊ शकतो. परंतु कराराचे खरे कारण अमेरिका असावी. अमेरिकेवरील अविश्वास वाढत असल्याने इतर आखाती देशांप्रमाणेच सौदी अरेबियालाही धास्ती वाटत असेलच. हे सगळे प्रकरण चीनच्या बाजूने झुकू शकते.

आता क्रिकेट भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन न केल्यामुळे क्रिकेटचा अनादर झाला असे माझ्या अनेक पाकिस्तानी मित्रांनी म्हटले. मी त्यांना फक्त एवढेच सांगितले, 'जनाब, मने एकत्र येत नाहीत तर हस्तांदोलनाची चर्चाच कशासाठी करावयाची? आम्ही नियमांनी बांधलेलो होतो म्हणून आपल्याबरोबर खेळलो एरवी खेळण्याची गरजच काय होती?'

---

## मोठा धमाका होणार ...

अडचणीत असताना मुख्यमंत्र्यांच्या बेडरूममधील गादी आणि सोफ्यासाठी २० लाख रु. खर्च केले जातात हे योग्य आहे का? मुख्यमंत्र्यांनी शेकडो कोटी रु. देऊन जाहिरातबाजी करणं योग्य आहे का?

- मेघा इंजिनिअरिंग कंपनीने अवैध उत्खनन केलं म्हणून तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांनी ९५ कोटींचा दंड ठोठावून त्याचं साहित्य जप्त केलं, परंतु महसूलमंत्र्यांनी मात्र केवळ १७ लाख रु. दंड भरण्यास सांगून जप्त केलेलं साहित्य परत करण्याचे आदेश दिले, हे योग्य आहे का?

- सिडको ची ५००० कोटी रुपयांची जमीन मंत्री संजय शिरसाट यांनी बेकायदेशीरपणे बिवलकर नावाच्या खाजगी व्यक्तीच्या घशात घातली. याबाबत मुख्यमंत्र्यांकडे १२००० पानांचे पुरावे देऊनही मुख्यमंत्री याप्रकरणी भूमिका घेत नाहीत, हे योग्य आहे का? अशी विचारणा केली आहे.

या विषयांवर आपण भूमिका मांडून आपल्या भूमिकांवाबत शंका घेणाऱ्यांचे गैरसमज दूर करावेतः अन्यथा हे शंका घेणारे आपणास अण्णा हजारे यांच्या पंक्तीत बसवतील, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे.

---

## आता रिकामं ठेवू नका, काहीतरी काम द्या...

तटकरेंनी केल्याचं धनंजय मुंडेंनी सांगितले.

**धनंजय मुंडे हा चळवळीतील माणूस- चंद्रकांत पाटील**

राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज रायगड जिल्ह्यातल्या माणगाव तालुक्यात असणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची पाहणी केली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना धनंजय मुंडे यांनी काल सुनील तटकरे यांच्याकडे मला काहीतरी काम द्या या वक्तव्यावर भाष्य केले. धनंजय मुंडे हा चळवळीतला माणूस आहे त्यामुळे तो स्वस्त बसू शकत नाही. त्यामुळेच त्यांनी कामासाठी मागणी केली असावी, असं वक्तव्य करत चंद्रकांत पाटील यांनी धनंजय मुंडेंची बाजू घेतली.



# देगलूर शहरास बायपास आवश्यक

## नितीन गडकरी यांच्या कडे धनाजी जोशी यांनी केली पत्राद्वारे मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
एकनाथ गाडीवान



**नांदेड :** जिल्ह्यातील देगलूर तालुका हा उपजिल्हा असून नांदेड जिल्ह्यातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेले एकमेव शहर असून, देगलूर हे तेलंगणा व कर्नाटक राज्याच्या सीमेवरती वसलेले एक मोठे शहर आहे. या ठिकाणी मोठी बाजारपेठ असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूकिची कोंडी होते. या वाहतुकीचा प्रचंड नाहक त्रास लक्षात घेता. भाई वळण रस्ता करणे खूप महत्त्वाची असल्याने हा बाह्यवळण रस्ता बागवान-टाकळी ते कारेगाव,कारेगाव ते तेलंगणा राज्यसिमा, हनुमान हिप्परगा रोड टाकळी, असा मार्ग मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्यासाठी दि.२४/०३/२५ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडे राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशन मराठवाडा अध्यक्ष धनाजी जोशी यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केली असता, दि.०१/६/२०२५ रोजी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयाचे पत्र, जनतेचा सेवक धनाजी जोशी यांना प्राप्त झाले असून त्या पत्रामध्ये असे नमूद केले की, नांदेड नरसी देगलूर विभाग असून महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे सोपवलेला नाही, कारण तो रस्ता बिओटी अंतर्गत दिलेला असून, सध्या नांदेड-नरसी-देगलुर विभाग महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने डि.बी.एफ अंतर्गत (एम.एस.एच-३) म्हणून विकसित केला आहे,एन-एच-१६१ घोषित होण्यापूर्वी नांदेड नरसी पासून चार पदरी आणि नरसी देगलूर विभागातील दोन पदरी करण्यात आला असून नांदेड नरसी चार लाईन ४३ किलोमीटर असुन, नरसी देगलूर दोन लाईन ३४.७० किलोमीटर चा ठेका हा, दि.०३/११/२०११ ना दिला असून त्याची मुदत दि.०२/११/२०२६ पर्यंत असून सध्या देगलूर शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग-१६१ हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गतरित्या येत असल्याने या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांचे मत विचारात घेतले जाऊ शकते, या शिवाय नांदेड-हैद्राबाद रोड मध्ये मिसिंग लींक म्हणून नांदेड ते देगलूर एम.एच.टि.एफ बॉर्डर या रस्त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल डीपीआर तयार करण्याचा प्रस्ताव सध्या एन.एच.ए.आय च्या विचाराधीन असल्याचे व या संदर्भात डीपीआरच्या निकषाच्या आधारे देगलूर शहरासाठी बाह्यवळण रस्ता (रिंग-रोड बायपास) विकासाबाबतच्या निर्णय भविष्यात विचारात घेतली जाऊ शकते असे पत्र तक्रारदार तथा राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशन मराठवाडा अध्यक्ष धनाजी जोशी यांना केंद्रीय रस्ते मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांच्या कार्यालया मार्फत पत्र प्राप्त झाले असून भविष्यात नांदेड जिल्ह्यातील देगलूर शहराचा रस्ता विषय विश्वासात घेऊन पूर्ण करण्याची या पत्रात नमूद केले आहे.

# कारंजा तालुक्यातील सर्व महसुल मंडळात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीची मदत द्या

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कारंजा लाड - प्रतिनिधी
अशोकराव उपाध्ये



**कारंजा लाड :** सातत्याने कोसळणाऱ्या पावसामुळे कारंजा तालुक्यातील खरीप हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले. तसेच शेतकऱ्यांनी कष्टाने उभ्या केलेल्या सोयाबीन, उडीद, तूर कपाशी यासह इतर पिके आडवी-तिडवी पडून मोठ्या प्रमाणावर नष्ट झाली आहेत.परिणामी अपेक्षित उत्पादनाचे स्वप्न उध्वस्त झाल्याने शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले असल्याने कारंजा तालुक्यातील सर्व महसूल मंडळातओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी संपूर्ण तालुक्यात दिवसेंदिवस तीव्र होत आहे. पावसाचा कहर आणि शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती लक्षात घेता शासनाने तातडीने मदतीची पावले उचलावीत अशी मागणी अजीत पवार राष्ट्रवादी पक्षाकडून चंद्रकांत दादा ठाकरे; दत्तराज डहाके यांचे कडून केल्या गेली आहे.

वृत्त असे की राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील सर्व शेतकरी एकत्र येऊन सोमवार, २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कारंजा तहसील कचेरीवर धडकले. यावेळी वाशिम जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे ; नगर परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तराज डहाके यांनी कारंजा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी आग्रही मागणी केली. सुखातीला कारंजा येथील खरेदी-विक्री केंद्रावर मोठ्या संख्येने शेतकरी एकवटले त्यानंतर तहसीलदार कुणाल झाल्टे साहेब यांना निवेदन सादर करून ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. या निवेदनातून शेतकऱ्यांच्या व्यथा शासनापर्यंत पोहोचवण्याचे ठरविण्यात आले असून, प्रशासनाने जर तातडीने निर्णय घेतला नाही, तर पुढील काळात उग्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांतदादा ठाकरे, माजी नगराध्यक्ष दत्तराजजी डहाके, माजी समाजकल्याण सभापती जयकिसनजी राठोड व अशोकराव डोंगरदिवे, महिला व बालकल्याण सभापती वैशालीताई लळे, जि.प. सदस्य दत्ताजी तुरक, आशिष दहातोंडे, मीनाताई भोने, सुनिताताई नाखले, माजी प.स. सभापती प्रदीपजी देशमुख व श्रीकृष्ण लाहे, जिल्हा देखरेख संघाचे सदस्य विश्वनाथजी ताथोड, तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष अरुण पाटील वानखडे, प्रवीण वानखडे, चंद्रशेखर डोईफोडे, शेखर पाटील काटोले याशिवाय प.स. सदस्य, कृ.उ.बाजार समिती संचालक, खरेदी-विक्री संचालक, सरपंच-उपसरपंच आणि शेकडी शेतकरी उपस्थित होते.

कारंजा तालुक्यात पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना पिकांचा विमा, पीक कर्जमाफी, बियाणे व खत अनुदान, तसेच घरगुती मदत यासारखी तातडीची आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. प्रशासनाने वेळीच पावले न उचलल्यास शेतकऱ्यांची स्थिती अधिकच गंभीर होईल, अशी चिंता ग्रामपातळीवर व्यक्त होत आहे.

**चंद्रकांतदादा ठाकरे; दत्तराज डहाके यांचे सह शेकडो शेतकऱ्यांची तहसील कचेरीवर धडक**

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष अरुण पाटील वानखडे यांनी यावेळी सांगितले की, राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने मदत न दिल्यास आम्ही रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन छेडू. शेतकऱ्यांची ही लढाई त्यांच्या हक्कासाठी असून, यात प्रत्येक शेतकऱ्याने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन देखील त्यांनी केले. प्रशासनावर दबाव वाढवून कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीची जाणीव शासनाला करून देण्याचा निर्धार करण्यात आला आहे. कारंजा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठीच्या आंदोलनामुळे संपूर्ण तालुक्यातील शेतकरी एकदिलाने पुढे सरसावणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# नवरात्र उत्सवा दरम्यान दरोड्याच्या तयारीत असलेले ५ आरोपी अटकेत

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी - समीर मुल्ला



**धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही**

**तुळजापूर :** महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी धाराशिवचा स्थानिक गुन्हे शाखा सतर्क होती. यावेळी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे नळदुर्ग तुळजापुर बायपास रस्त्यावर कारवाई करून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तुळजापुर शारदीय नवरात्र महोत्सव दरम्यान मालाविषयी गुन्हयांस प्रतिबंध करणेकरिता तुळजापुर शहरात गर्दीचे ठिकाणी पायी पेट्रोलिंग करीत असताना पथकास गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की नळदुर्ग ते तुळजापुर जाणारे बायपास रोडवर एका पांढरे रंगाचे चारचाकी वाहनामध्ये काही इसम दरोडा टाकण्याचे तयारीत थांबलेले आहेत अशी माहिती मिळाल्याने लागलीच सदरची माहिती वरीष्ठांना माहिती देऊन पथकाने माहिती मिळालेल्या ठिकाणी नळदुर्ग ते तुळजापुर जाणारे बायपास रोडवर १९.१५ वा. गेले असता तेथे त्यांना एक पांढरे रंगाची स्वीफट कार क्र.एम.एच.११ एके ९६२१ ही दिसली पथकाने त्यांच्या गाड्या थांबवून गाडीमधून उतरून सदर कारकडे जात असताना पथकाला पाहुन कारमधील दोन इसम उतरून पळून जाण्याचे तयारीत असताना त्यांना जागीच पकडले, तसेच कारमधील असलेले तिघांनाही पकडुन त्या पाच इसमाना त्यांचे नाव गाव व सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारले असता त्यांनी सुरवातील उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर खाक्या दाखवताच संशयितांनी नावे सांगितली.

आरोपींच्या ताब्यातून दरोडा टाकण्यासाठी वापरायचे साहित्य व धारदार कोयता जप्त करण्यात आला. रोहीत उर्फ तात्या अंकुश गायकवाड (३६, रा. सुभाष कॉलनी, बीड) अमर आसाराम गायकवाड (२३, रा. नळवंडी नाका, बीड) राजेश अभिमान जाधव (२७, रा. च हाटा, बीड) राजाभाऊ ज्ञानदेव यादव (२५, रा. वांगी, बीड) व प्रशांत दिलीप डाके (२५, रा. स्वराज्य नगर, बीड) यांना अटक केली.पोलिस तपासात आरोपींवर यापूर्वी दरोडा, चोरीसह गंभीर गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे.

सदर आरोपींविरुद्ध तुळजापुर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३४९/२०२५ भा.न्या.सं. कलम ३१०(४), ३१० (५) व शस्त्र अधिनियम ४/२५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर कारवाई ही धाराशिव पोलीस अधीक्षक रितु खोकर, अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोलिस हवालदार विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, दत्ता राठोड, दया गादेकर, नितीन जाधवर, महिला पोलिस हवालदार शोभा बांगर, पोलिस नाईक बबन जाधवर, यादव, आंधळे, महेबुब अरब, सुभाष चौरे, विनायक दहीहंडे यांच्या पथकाने केली आहे.

# लेंडी-मन्याड जनसेवा कार्यालयाचे भव्य शुभारंभ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे



**देगलूर :** देगलूर शहरातील तुकाराम नगरी येथे लेंडी-मन्याड जनसेवा कार्यालयाचे भव्य उद्घाटन सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या सोहळ्याला नांदेड-हिंगोली जिल्ह्यासह विविध भागातील संत-महाराजांचे थोर सान्निध्य लाभले. हा शुभारंभ सोहळा १०८ श्री ष.ब्र. सोमलिंग शिवाचार्य महाराज (बिचकुंदेकर), १०८ श्री ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलूरकर), १०८ श्री ष.ब्र. सिध्ददयाल शिवाचार्य महाराज (बेटमोगरेकर), १०८ श्री ष.ब्र. मल्लिकार्जुन शिवाचार्य महाराज (खतगावकर), १०८ श्री ष.ब्र. दिगंबर शिवाचार्य महाराज (वसमंतकर), १०८ श्री ष.ब्र. विरुपक्ष शिवाचार्य महाराज (मुखेडकर), १०८ श्री ष.ब्र. शंभुलिंग शिवाचार्य महाराज (उदगीरकर), १०८ श्री ष.ब्र. शंकरलिंग शिवाचार्य महाराज (हणेगावकर) व १०८ श्री ष.ब्र. बसवलिंग शिवाचार्य महाराज (कौळासकर) यांच्या दिव्य उपस्थितीत पूजन व उद्घाटन विधी पार पडला.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी हे कार्यालय एक नवा आधारस्तंभ ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. लेंडी-मन्याड जनसेवा कार्यालयाच्या माध्यमातून शेतकरी, गोरगरीब, उपेक्षित व वंचित घटकांच्या समस्या सोडविण्यासाठी ठोस प्रयत्न केले जाणार आहेत. हे कार्यालय सर्वसामान्यांना त्यांच्या अडचणी व प्रश्न मांडण्यासाठी आणि त्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी सक्षम व्यासपीठ ठरेल, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली.या प्रसंगी बोलताना सेवानिवृत्त सनदी अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर म्हणाले. 'माझे शिक्षण देगलूर परिसरात झाले असून, देगलूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदावर काम करताना मला जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. काही वर्षांपूर्वी शासकीय सेवेतून स्वेच्छा निवृत्ती घेत संपूर्ण वेळ जनसेवेसाठी अर्पण करण्याचा संकल्प केला. गेल्या काही वर्षांपासून तळागाळातील जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील आहे. हा भाग मला घडवणारा असून, त्याचे काहीतरी देणे लागतो या भावनेतूनच या कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.' याप्रसंगी नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते-पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, तसेच सुमठाणकर यांचे मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्यांना पुढील समाजसेवेसाठी शुभेच्छा दिल्या. शुभारंभानंतर जनतेमध्ये समाधान व्यक्त होत असून, 'लेंडी-मन्याड जनसेवा कार्यालय हे खऱ्या अर्थाने सामान्य जनतेच्या सोयीसाठी, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आणि समाजसेवेचे केंद्र ठरेल' असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

# सततच्या मुसळधार पावसाने भालगाव येथील पिके पाण्यात?

## पंचनामे करून नुकसान भरपाईची गावकऱ्यांची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अंबड - प्रतिनिधी
ज्ञानेश्वर साळुंके

**अंबड :** तालुक्यातील भालगाव येथे सतत पडणाऱ्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे पिके वाहून गेली असून जिवापाड जतन केलेल्या पिकाचे नुकसान पाहून शेतकऱ्यावर मोठे अस्मानी संकट उभे राहीलेले दिसून येत आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, ऊस, मोसंबी, आदी पिकात पावसाचे पाणी साचलेले दिसून येत असून पिके पिवळे पडलेले बघावयाचे चित्र पहावयास मिळत आहे. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. भालगाव या गावच्या वर असणारा भाटखेडा येथील पाझर तलाव तुडूंब भरला असून त्या तलावाच्या सांडव्यातून पाणी भालगाव येथील भद्रायणी नदीत



पाण्याचा विसर्ग चालू असून नदीला पूर परिस्थिती निर्माण होत असून नदीच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पंचनामे करून नुकसान झालेल्या शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यातून उपस्थित होत आहे.

**शेतकऱ्याची प्रतिक्रिया**

सततच्या मुसळधार पावसाने शेतकऱ्याच्या पिकात पाणी साचले असून प्रशासनाने तात्काळ सरसगट पंचनामे करून शेतकऱ्यांला नुकसान भरपाई द्यावी.

**सिद्धेश्वर रमेशराव मुळे**

# माजलगाव डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात एस टी बसचे झाले ब्रेक फेल

## ड्रॉइवर वाहकाने एस टी बसचे ब्रेक फेल झाल्यामुळे प्रसावधान राखुण एसटी बस जागेवर रोखली जिवीतहानी टळली

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माजलगांव - प्रतिनिधी
नाजेर कुरेशी



**नगर परिषद कर्मचारी झाले जख्मी**
**नावे १) रूसतुम २) सखाराम होके, व इतर नागरिक**

**माजलगांव :** माजलगांव शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात एस टी बस सोलापुर ते जिंतुर या एसटी जिंतुर आगाराची बस क्रमांक MH20, BL ,3863, ब्रेक फेल झाल्यामुळे माजलगांव नगर परिषद कर्मचारी यांना धडक़ दिल्याने जख्मी झाले असुन जवळच्या ग्रामीण रूणालयात दाखल करून उपचार सुरू आहे. एस टी मंहाडळ यांचे दूर्लक्षामुळे भंगार ना दुरूस्त गाड्या असल्याने नागरिकाच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, महाराष्ट्रात खुप सारे एस टी बस असे पाहण्यास मिळेल भंगार एस टी बस गाड्यमुळे नागरिकात संताप भंगार गाडीचे व्यवस्था कोठे धुर मार कोठे चाकाचे नट बोल्ट निसटुन पड तर कोठे ब्रेक फेल होत आहे असे विविध प्रकारचे एस टी बस चे पाट खराब आहे, तरी महाराष्ट्र सरकार अपेक्षा आहे तवरीत नविन गाड्याची व्यवस्था करा असे नागरिकात चर्चा आहे.

# अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरणासाठी मातंग समाजाचे कंधारमध्ये जलभरो आंदोलन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कंधार - प्रतिनिधी
माधव गोटमवाड



**कंधार :** अनुसुचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणासाठी शुक्रवारी, दि.१९ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता कंधारमध्ये जलभरो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात तालुक्यातील मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लोकस्वराज आंदोलन या संघटनेने जलभरो आंदोलन आयोजित केले होते. या आंदोलनादरम्यान, सेवानिवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा कालावधी कमी करण्यात यावा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पूर्वी आरक्षण उपवर्गीकरण लागू करण्यात यावे, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. या आंदोलनात लोकस्वराज्य आंदोलनाचे मराठवाडा संघटक पंडितराव देवकांबळे, जिल्हा उपाध्यक्ष संभाजी वाघमारे, जिल्हा कोषाध्यक्ष बालाजी वाघमारे, तालुकाध्यक्ष कृष्णकांत गायकवाड, माजी पं.स. सदस्य रामभाऊ देवकांबळे, हानमंत घोरपडे, प्रकाश ननुरे, भाऊसाहेब कांबळे, परमेश्वर गायकवाड, गोपाळ वाघमारे, परमेश्वर बोयवार, नागेश गायकवाड, दिपक गायकवाड, संजय कांबळे, राजू मळगे, महेंद्र कांबळे, बालाजी कांबळे, निलेश मोरे, साईनाथ मळगे, विकास गायकवाड, श्याम गंडबे, महेश कांबळे, धनराज कांबळे, सचिन तेलंग, ऋषिकेश वाघमारे, दिपक कांबळे, अरुण वाघमारे, आशिष वाघमारे, आदींसह मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलीसांनी आंदोलनकर्त्यांना अटक करुन नंतर सोडून दिले.


श्री महागणपती इण्डेन गॅस दुर्गम श्रेत्रिय वितरक

IndianOil The Energy Of India

शिंदोडी - निमोणे रोड (गट - ९५/१)
शिंदोडी, ता.शिरूर, जि.पुणे (४१२२१०)

Indane SAFE.RELIABLE.CONVENIENT

मो.९३२५०९१४३३ / ९७६६६०५०२१ / ८८३०६९८८४८



नविन कनेक्शन रेट




✻ रू.४०१०/- : १ सिलिंडर बिगर शेगडी
✻ रू.७०६०/- : २ सिलिंडर बिगर शेगडी
✻ रू.५५००/- : १ सिलिंडर - शेगडी सहीत
✻ रू.७५००/- : २ सिलिंडर - शेगडी सहित

जाहिरात संकलन : श्री.इंद्रभान ओव्हाळ


# विश्वशांती बौद्ध विहार भ्रष्टाचार प्रकरण
# ठेकेदार-अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते



**आश्वासनानंतर उपोषण मागे; आंदोलन पुन्हा पेटण्याची शक्यता**

**लातूर (उदगीर) :** बहुजन विकास अभियानाचे प्रमुख संजयकुमार व संघटक मानसिंग पवार यांनी उदगीर येथे विश्वशांती बौद्ध विहाराच्या बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराविरोधात पाच दिवस अमर उपोषण केले. त्यांनी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. दरम्यान, उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांनी येत्या वीस दिवसांत सर्व समाजाची बैठक घेऊन दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या विनंतीला मान देऊन तात्पुरते उपोषण मागे घेण्यात आले. मात्र, दिलेल्या मुदतीत कारवाई न झाल्यास मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा बहुजन विकास अभियानाने दिला आहे. मूळ बांधकाम केवळ आठ महिन्यांत गळतीस लागले असून, तात्पुरत्या दुरुस्त्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. या कामात सुरुवातीपासूनच ठेकेदार व अधिकाऱ्यांचा मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यांना दिलेली देयक रक्कम परत घेण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यात आली.

सदर बौद्ध विहाराचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले होते. देश-विदेशात लौकिक मिळालेल्या या स्थळाला भ्रष्टाचारामुळे डाग लागल्याने समाजामध्ये संतापाची लाट पसरली आहे. 'प्रशासन आणि समाजाची फसवणूक करणाऱ्या दोषींवर गुन्हे दाखल झाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही,' असा इशारा बहुजन विकास अभियानाचे प्रमुख संजयकुमार यांनी दिला आहे.

# कानपूर घटनेच्या विरोधात धर्माबादमध्ये निषेध रॅली हजारोंच्या संख्येने तहसीलदारांकडे निवेदन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धर्माबाद - प्रतिनिधी
किरण गजभरे

**निषेध रॅलीला विविध संघटनांचे अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने तरुण उपस्थित होते. सर्वांनी यावर भर दिला की दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि मुस्लिमांच्या धार्मिक भावनांचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.**

**धर्माबाद :** २० सप्टेंबर रोजी धर्माबाद शहरात पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अपमानाच्या निषेधार्थ एक भव्य निषेध रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने मुस्लिम समुदायाचे सदस्य सहभागी झाले होते. काल धर्माबाद शहरात प्रेषित मुहम्मद यांचा स्टिकर लावल्यामुळे कानपूर उत्तर प्रदेश येथे गुन्हा काही मुस्लिम समजाच्या तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचा निषेधार्थ धर्माबाद शहरात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. सविस्तर व्रत असे की, इस्लाम धर्माचे पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या नावाने उत्तर-प्रदेश कानपुर, येथे मोहल्ला सय्यदनगर, रावतपुर येथील मुस्लिम समाजाच्या २५-व्यक्तींनी आय-लव्ह-मोहम्मद सल्ला च्या नावाचा फलक व रौशनाई करीत असतांना तथाकथीत स्थानिकांनी फलक लावला याकारणाने खोटे आरोप करुण पैगंबर, हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अनुयाई त्यांचे अनुपान करु नये व त्यांचा जयघोष रौशनाई, सजावटी त्यांच्या नावाचे फलक लावु नये यासाठी इस्लाम धर्मातील अनुयायी पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मानणाऱ्या मुस्लिम वर्गावर गुन्हा दाखल करुण संविधानाने दिलेल्या अधिकाराचे उल्लंघन केले आहे पेंगंबर हजरत मोहम्मद-(सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी दिलेल्या धर्माचे पालन करीत असतांना योग्यती कायदेशीर परवागी घेतलेली असतांना सदरील नांवे फक्त एकाच दिवसासाठी लावलेली असतांना तथाकथीत संघटनेने याचा विरोध केल्यामुळे पोलीसांनी तथा कथीत संघटनेचा लोक संख्येचा आधारावर, प्रशासनावर दबाव निर्माण करुण ४ तारखेचे कार्यक्रम असतांना दि.१०/९/२०२५ रोजी म्हणजेच आठ दिवसानंतर तथा कथीत संघटनेने पोलीसांवर दबाव आणुन इस्माल धर्माचे अनुयायी पेंगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मानणाऱ्यावर मुस्लिम वर्गाच्या २५ लोकांविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

तरी सदरील गुन्हा रद्द करण्यात यावा कारणे कि, भारतीस गणराज्यात अनेक जाती व धर्माचे लोक राहतात संविधानाने त्यांना त्यांच्या धर्माचे पालन व अनुकरण करण्याचे अधिकार दिलेले आहे. परंतु पोलीसांनी आपल्या पदाचा गैर वापर करुण खोटा गुन्हा दाखल केला आहे. इस्लाम धर्मामध्ये पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम.) हे इश्वराचे अंतीम संदेशवाहक आहेत. ते समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी आलेले होते, म्हणुन त्यांना जगात सर्वाधिक मानणारा वर्ग आहे. पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) बदल आदर, प्रेम, भावना हा फक्त मुस्लिम नव्हे तर भारतातील बहुतेक इतर धर्म, जाती, आणि समाजाचे विद्वान सुद्धा मानतात, त्यांचे विचार, आदर्श चे सन्मान करतात आणि त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्याचे संविधानाने सर्वांनना अधिकार दिलेले आहे. म्हणुन असे कृत्य घडू नये यासाठी योग्यती कार्यवाही करण्यात यावी.व तसेच, आमच्या सर्वांकडून अशी मागणी केली जाते की पूर्वीच्या मागणीप्रमाणे, प्रेषित पैगंबर मोहम्मद डथड विधेयक किंवा महापुरुषांच्या सन्मानार्थ विधेयक मंजूर केले जावे, तरी समाजाच्या शत्रूंवर कठोर कारवाई केली पाहिजे जे कोणी कोणत्याही धर्माच्या किंवा समाजातील आदरणीय, प्रेरणादायी आणि सन्माननीय महापुरुषांचा अपमान करतात, जेणेकरून भविष्यात कोणीही देशाच्या एकता आणि समानतेमध्ये अशी दरी निर्माण करण्याचे धाडस करणार नाही. असे लेखी निवेदन महामहीम राष्ट्रपती यांना तहसीलदार यांच्या मार्फत धर्माबादच्या मुस्लिम समाजाकडून देण्यात आला असून या मोर्चात धर्माबाद तालुक्यातील तमाम जाती धर्माचे लोक सहभागी झाले होते. विशेष यावेळी समस्त मुस्लिम समाज उपस्थित होता.

# नाटकरवाडी गावाचा संपर्क तुटला; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पैठण - प्रतिनिधी
तुषार नाटकर



**पैठण :** सोमवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे पैठण तालुक्यातील नाटकरवाडी गावाचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. मुसळधार पावसामुळे परिसरातील ओढे-नाले तुडुंब भरून वाहू लागले. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे गावाकडे जाणारे रस्ते धोकादायक झाले आहे. गावातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उभी पिके कापूस, सोयाबीन, बाजरी यांसह भाजीपाला अक्षरशः डोळ्यासमोर वाहून गेला. शेतात पाणी साचल्याने पुढील काही दिवसांमध्ये पिकांचे आणखी नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अचानक झालेल्या या आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांच्या चेहऱ्यावर हतबलता दिसून येत आहे. गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे. 'आमचे पिके वाहून गेली, काहीही शिल्लक राहिले नाही. आता घरखर्च आणि कर्जफेड कशी करायची? असा प्रश्न शेतकरी बांधवांकडून विचारला जात आहे. सद्यस्थितीत सरपंच व स्थानिक कार्यकर्त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

# कळंब तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा - गोरे यांची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धाराशिव - प्रतिनिधी
समीर मुल्ला



**धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यासह कळंब तालुक्यात काही दिवसापासून सुरूअसलेल्या सततच्या ढगफुटी सदृश्य, व अतिवृष्टी पावसामुळे शेतकऱ्यांचे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून अद्यापही पाऊस दररोज सुरूच असल्याने शेतकऱ्यांचे यामध्ये मोठे नुकसान होत आहे. यामध्ये सोयाबीन, उडीद, मूग, कांदा,ऊस यासह इतर पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी बबुवान गोरे यांनी दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, त्यामुळे तात्काळ शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा कारण शेतकरी अगोदरच कर्जबाजारी आहे व अतिवृष्टीमुळे आणखीनच अडचणीत सापडला असल्याने संपूर्ण उद्धवस्त झाल्याची परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, तसेच शेतकऱ्यांच्या पिकाच्या नुकसानीची भरपाई तात्काळ देण्यात यावी, नदीच्या पुरामुळे मृत्यू पावलेल्या जनावरांची आर्थिक मदत शेतकऱ्यांना देण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे. सदर निवेदनावर बबुवान गोरे, मानव अधिकार आंदोलन चे हनुमंत पाटुळे, अण्णासाहेब फरताडे, अंगद शिंदे, बाबुराव कवडे, हनुमंत रितापुरे, सरपंच सचिन कापसे, विजय जाधव, अमोल रितापुरे, रामहरी रीतापुरे, चक्रधर रीतापुरे, प्रतिक्र रितापुरे, बापू निंबाळकर, प्रशांत जाधव, यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# ✻ प्रेरणादायी गोष्ट ✻

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

## मेणबत्ती आणि अंधार



एका छोट्या गावात सतत अंधार असे. लोक दिवसभर मेहनत करत, पण रात्री अंधारामुळे त्यांना काहीच करता येत नसे. एकदा गावातल्या एका मुलाने छोट्या मेणबत्तीला हातात घेतलं आणि चालायला सुरुवात केली. लोक हसले, 'एवढ्या छोट्याशा ज्योतीने हा काळोख हटणार आहे का?'

पण त्या मेणबत्तीच्या प्रकाशाने एक पाऊल पुढे दिसू लागलं. तो मुलगा चालत राहिला, त्याच्यासोबत आणखी दोन लोक मेणबत्ती घेऊन उभे राहिले. हळूहळू सगळ्यांनी आपापल्या मेणबत्त्या पेटवल्या. आणि बघता बघता गावाचा अंधार दूर झाला.

✻ **तात्पर्य :**

'जग बदलायचं असेल तर मोठा दिवा होण्याची गरज नाही;
लहानशी मेणबत्ती पेटवली तरी अंधार हटतो.
तुमची छोटीशी कृतीही अनेकांना प्रेरणा देऊ शकते.'

**सुविचार**

मनातलं स्वप्न मोठं असावं,
त्यासाठी मेहनतही तितकीच हवी.
अपयश आलं तरी थांबू नये,
कारण अपयश हेच यशाचं पाऊल असतं.
विश्वास ठेव स्वतःवर,
जग जिंकणं मग अशक्य नाही.


**CHANGE IN NAME**

My (Old Name) is **SAMEER AHMED**, Which Now I am Changing as (New Name) **SAMEER AHEMAD KHAN NISAR AHEMAD KHAN,** Hence, forth my all correspondence will be done as per my New Name. Please Consider the same.

Contact :
**SAMEER AHEMAD KHAN**
**NISAR AHEMAD KHAN**
H. No. 2-5-315, Duleshah Rahamn Nagar, Near Duleshah Raheman Masjid, Nanded-431601.
**Mob No: 9423305838**


## चुटकुले

सासू आणि सुन यांच का पटत नाही ?
अखेर भारतीय संशोधकांनी त्याचा शोध लावलाच ...
नावातच घोळ आहे हो ..

सा- सारख्या
सू - सूचना
आणि
सु - सुचना
न - नको

कस पटेल सांगा ना ?


This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)

# पेठवडज प्राथमिक आरोग्य केंद्र डॉ.स्नेहा बोबडे यांचा गावकऱ्याकडून सत्कार

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पेठवडज - प्रतिनिधी**
**सूर्यकांत पैनापल्ले**




**पेठवडज :** ता.कंधार येथील आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय मार्फत स्वस्थ नारी सशक्त परिवार या राष्ट्रीय अभियानाची १७ सप्टेंबर पासून सुरुवात झाली. जिल्हा आरोग्य अधिकारी संगीता देशमुख यांच्या सूचनेप्रमाणे तालुका आरोग्य अधिकारी प्रसाद केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र पेठवडज येथे महिला आणि बालकांसाठी दिनांक १८ सप्टेंबर रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत महिलांचे सिकलसेल आजार, सेल्युबिलिटी तपासणी, क्षयरोग, कुष्ठरोग, शुगर, बी.पी.तपासणी ,गरोदर माता तपासणी करण्यात आली. महिलांमध्ये होणारी हाडांची झीज Bone mineral density (BMD) या मशीन द्वारे तपासण्यात आली तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती व लाभ देण्यात आला. यावेळी गावातील व परिसरातील शेकडो महिला व बालकांनी या शिबिराचा लाभ घेतला. सध्याच्या काळात सरकारी कर्मचारी हे फक्त कर्तव्य म्हणून कार्य करतात. पण डॉ. स्नेहा बोबडे यांनी सामाजिक भान व रुग्णाप्रती माणुसकीची भावना जपून या शिबिरासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी या शिबिरासाठी खास करून नांदेडचे स्त्रीरोग तज्ञ डॉ. वैदेही चिद्रावार मॅडम, डॉ.विजया गोपुलवाड मॅडम अस्थिरोग तज्ञ डॉ. श्रीनिवास जाधव या विशेष तज्ञांना आमंत्रित केले होते. ग्रामीण भागातील महिलांना विशेष तज्ञाचा मार्गदर्शनाचा मोफत लाभ मिळवून दिला.

कर्तव्याच्याही एक पाऊल पुढे जाऊन समाजाविषयी रुग्णाविषयी आपलेपणाची भावना जपली. रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा प्रामाणिक प्ने देण्यात त्या कधीही कसूर करीत नाहीत.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन गावकऱ्यांनी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावी, त्यांचं मनोबल वाढून भविष्यातही चांगल्या कामासाठी ऊर्जा मिळावी म्हणून त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. त्यांचे सर्व सहकारी स्टाफ यांचाही गावकऱ्याच्या वतीने पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. निस्वार्थ सेवा करत गेल्याने आपल्याला आनंद तर मिळतोच शिवाय त्याचा रुग्णांना ही फायदा होतो. भविष्यात ही आपण समाजोपयोगी उपक्रम राबविणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# चाकुर तहसीलदारांना सकल धनगर समाजाने दिले निवेदन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**चाकूर - प्रतिनिधी**
**किशन वडारे**




चाकूर तालुक्यातील सकल धनगर समाज हा दि.२४ सप्टेंबर रोजी मोठ्या संख्येने जालना येथे उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांना समर्थन देण्यासाठी व एस.टी. अरक्षण अमंलबजावणी साठी तालुक्यातून हजारोंच्या संख्येने जाणार असल्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

**चाकूर :** चाकूर येथील सकल समाजाच्या वतीने धनगर जमातीला अनुसूचित जमातीचे (एस.टी.) आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी चाकूरचे तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. सन २०१४ साली बारामती या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळुन धनगर जमातीच्या घटनादत्त ST आरक्षणाची अमलबजावणी करुन जालणा येथे उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांचे आमरण उपोषण तात्काळ सोडवावे यासाठी तहसीलदार नरसिंग जाधव यांच्या कडे तालुक्यातील धनगर समाज बांधवांच्या वतीने निवेदन देण्यात आले. २०१४ साली बारामती येथे धनगर समाजाच्या लाखोंच्या जन-समुदयाला सबोंधित करतांना देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, माझा धनगर एस.टी. आरक्षणा बाबतीत फार अभ्यास झाला असुन या बाबत माझ्याकडे धनगर एस.टी आरक्षण बाजुने पुष्कळ असे पुरावे आहेत. आता पर्यंतच्या राज्यकर्त्यांनी धनगरांचा फक्त मता पुरता वापर केलेला आहे. तुम्ही आम्हाला या राज्याच्या सत्तेवर बसवा आमची सत्ता आल्यास पहिल्या कॅबिनेट बैठकीत आम्ही घटनादत्त धनगर एस.टी. आरक्षणाची अमंलबजावणी करतो. मात्र आज पर्यत कॅबिनेटच्या शेकडो मिटींग झाल्या, शेकडो आदोंलन झाले तरी सुद्धा फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला नाही, म्हणुन आमचे बांधव दिपक बोऱ्हाडे हे दिनांक १७/०९/२०२५ रोजी पासुन नियोजीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक, अंबड चौफुली, जालना येथे उपोषणास बसले आहेत. आज त्यांचा उपोषणाचा ६ वा दिवस आहे.अजुन पर्यत आपण या उपोषणाची/आंदोलनाची दखल घेतली नाही. आपण २ दिवसाच्या आत धनगर जमातीच्या घटनादत्त एस.टी. आरक्षणाची अमलबजावणी करुन दिपक बोऱ्हाडे यांचे उपोषण तात्काळ सोडवावे, अन्यथा दिपक बोऱ्हाडे सागंतील त्या पद्धतीने तसेच धनगरी बाणाने राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जातील. तसेच दिपक बोऱ्हाडे यांच्या जीवतास काही बरे-वाईट झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील असा इशाराही या निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. यावेळी सुरेशदादा हाके, दयानंद सुरवसे, लहू कोरे, गंगाधर केराळे,नारायण काचे, अशोक शेळके, अमोल बने, चंद्रकांत एनकफळे, सचिन एनकफळे, डॉ.भरत हाके, साई सुळ, ज्ञानेश्वर हांडे, बाळू हाके, गणपत वागलगावे, ज्ञानेश्वर गाडेकर, तानाजी वागलगावे, गोविंद चिंचोळे, बालाजी मलीशे, गुणवंत पाटील, काशीनाथ पाटील, भुजंग सुरवसे, लिंबराज केसाळे, मारोती तिवडे, देवानंद वागलगावे, खंडू वागलगावे, पुंडलिक वागलगावे, राजकुमार कांबळे, मल्हारी कांबळे, नंदकुमार पाटील, श्रिसागर सुरवसे, राजेंद्र मलिशे, आम्रपाली तिघुटे, राधा सुरवसे, शकुंतला शेवाळे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगाव पंचायतराज अभियानात महिलांचा पुढाकार - जनजागृती, प्रसार - प्रचार मोहीम सुरू

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**




**जालना (मंठा) :** तालुक्यातील नायगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान लोकसहभागातून गतीमान होत असून, 'सर्वांना सोबत घेऊन चालूया' या तत्वावर ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेत शंभर टक्के नागरिकांनी सहभाग नोंदवला. गावकऱ्यांनी एकदिलाने सहभाग घेतल्याने हे अभियान लोकचळवळीत रूपांतरित होण्यासाठी वातावरण निर्माण झाले आहे. सरपंच चंद्रकला सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभा, महिला सभा आणि वार्डसभा घेतल्या जात असून सुशासनयुक्त पंचायत निर्माण करण्याचे ध्येय ठेवले आहे.

**वार्डसभा उपक्रम**

वार्ड १ - नरेंद्र महाराज सत्संग स्थळ

वार्ड २ - गौतम विहार मंदिर

वार्ड ३ - रामराव पवार यांचे आवार

देखरेख समितीचे अध्यक्ष अविनाश राठोड यांनी नागरिकांना 'स्मार्ट व्हिलेज'साठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच नागरिकांनी मेरी पंचायत, पंचायत निर्णय आणि ग्राम संवाद हे ॲप्स मोबाईलमध्ये डाउनलोड करून शासनाच्या विविध योजनांची माहिती घ्यावी, असा सल्ला दिला.

**नागरिक व कार्यकर्त्यांची मते**

१. बळीराम राठोड (संचालक, मार्केट कमिटी) - 'स्वच्छता, वृक्षलागवड आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी नागरिकांनी सक्रीय सहभाग घ्यावा.'

२. सुमनबाई सांगळे (अंगणवाडी सेविका) - 'अभियानाची सुरुवात आपण स्वतःपासून करावी. घर व परिसर स्वच्छ ठेवावा, शौचालयाचा वापर, परसबाग, सांडपाण्याचा योग्य उपयोग करून गाव सुंदर बनवावे.'

३. सखुबाई राठोड (अंगणवाडी सेविका) - 'आपण सुधारलो तर आपले गाव नक्कीच आदर्श बनेल. वृक्षलागवड व स्वच्छता हे सर्वांनी अंगीकारावे.'

४. अनुराधा फुपाटे (अध्यक्षा, आय.सी.आर.पी बचत गट) - 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज संदर्भातील शासन निर्णय वाचून दाखवला आणि गावाच्या विकासाविषयी सखोल माहिती दिली.'

**शैक्षणिक व प्रशासकीय साथ**

मुख्याध्यापक सुभाष जायभाये यांनी जिल्हा परिषद शाळेतून पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. ग्रामपंचायत अधिकारी बी. एस. गवळी यांनी 'गावकरी आणि प्रशासनाच्या मदतीने अभियान पूर्णत्वाकडे नेण्यासाठी कठोर परिश्रम घेऊ' असे सांगितले.

**उपस्थिती**

या अभियानात उपसरपंच नामदेव फुपाटे, ग्रामपंचायत सदस्य मीना दहिजे, आश्विनी मगर, शालू राठोड, सुमित्रा फुपाटे, यशोदाबाई अंभोरे यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माहेश्वरी ईसादकर या १६ वर्षीय विद्यार्थीनीनी कळसुबाई शिखर केले सर

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उस्माननगर - प्रतिनिधी**
**लक्ष्मण कांबळे**



माहेश्वरी रामेश्वर ईसादकर या विद्यार्थीनीनी उस्माननगर पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस

**नांदेड/उस्माननगर :** कळसूबाई म्हटलेकी आठवते सह्याद्रीच्या रांगेतील आणी महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर या शिखराला महाराष्ट्राचे एव्हरेस्ट आसेही म्हटले जाते. हे शिखर चढण्यासाठी चांगलीच शारीरिक क्षमता आसावी लागते. हे शिखर सरळ मोजलेतर १६४६ मीटर आहे. हे शिखर सर करण्यासाठी साडेसहा किलोमीटर हे परिसर चालत जावे लागते. हे एक सोपे काम नाही हे काम उस्माननगर पोलीस स्टेशनच्या लेडीज पोलीस कॉ.ज्योती सांगवीकर/ईसादकर यांची पुतनी उपनिरीक्षक डॉ.सौ लोपामुद्रा आनेराव/कुबडे यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी दि.१७ सप्टेंबर रोजी सतत पाऊस चालु आसतांना, कठीण जंगलातून, दरीखो-यातून खडतर मेहनत करून महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वता पैकी एक उंच आसलेले कळसुबाई शिखर सर करून भारतीय तिरंगा ध्वज फडकिवीला यावेळी उस्माननगर पोलीस स्टेशनच्या लेडीज पोलीस कॉ.ज्योती सांगवीकर / ईसादकर, नांदेड पोलीस मुख्यालयातील लेडीज पोलीस कॉ.कांचन तेलंग, लेडीज पोलीस कॉ.रंगना स्वामी व त्यांचा मुलगा रुद्राक्ष स्वामी यांनी कळसुबाई शिखर सर केले. हे शिखर एवढ्या कमी वयात सर केल्याबद्दल माहेश्वरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सिनेकाठच्या शेतकऱ्यांचे तातडीने कोणत्याही अटी शर्ती चे निकष न लावता पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी

## शेतकऱ्यांची दयनीय अवस्था -बाळराजे पाटील

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मोहोळ - प्रतिनिधी**
**बापू घळके**



**मोहोळ :** सोमवार दिनांक १५ सप्टेंबर पासून सलग आठ दिवस झाले सिना नदीला सुरू असलेल्या महापुरामुळे सीना नदी काठच्या भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आपत्तीत शेतकरीवर्गाचे अतोनात नुकसान झाल्याने ते आर्थिकदृष्ट्या बेहाल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन विभाग व प्रशासन यांना सीना नदी काठच्या सर्व लोकांना सरसकट नुकसानभरपाई देण्याची विनंती केली आहे.

बाळराजे पाटील यांनी सांगितले की, 'या महापुरात प्रत्येक शेतकऱ्याची मोटार, पाईप, केबल, स्टार्टर, मेगा, पॅनल बॉक्स इत्यादी महत्त्वाची साधने आणि उपकरणे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली आहेत. हे सर्व साहित्य पुन्हा जमवाजमव करण्यासाठी किमान पन्नास हजार रुपये तरी खर्च येणार आहे. याशिवाय, हाता तोंडाशी आलेला घास म्हणजे ऊस मका, उडीद, कांदा, या पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.' त्यामुळे, शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी प्रशासनाने सांगितल्याप्रमाणे त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाई प्रक्रिया गतीने पूर्ण करावी, अशी मागणी बाळराजे पाटील यांनी केली आहे. शेतकऱ्यांची सध्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे आणि त्यांना तातडीने सरकारी मदतीची गरज आहे, असे ते म्हणाले. यामध्ये बोपले, एकुरके, पासलेवाडी, अनगर स्टेशन, बिटले, नरखेड, मलिकपेठ डिकसळ, दाईंगडेवाडी, घाटणे, मोहोळ स्टेशन, आष्टे, भांबेवाडी, शिरापूर, लांबोटी. आदी मोहोळ तालुक्यातील नदी काठच्या गावाचा समावेश आहे.

या संदर्भात, स्थानिक शेतकऱ्यांनीही जिल्हाधिकारी व प्रशासनाकडे तक्रारी नोंदवल्या आहेत आणि तातडीने मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आता प्रशासन यावर काय कृती करते, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# कोटेकोल्लूर येथील डी.पी. त्वरीत उपलब्ध करून द्या - महेश पाटील यांची मागणी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**नांदेड - प्रतिनिधी**
**प्रा.विजयकुमार दिग्रसकर**



**देगलूर :** देगलूर तालुक्यातील लिंबा व कोटेकल्लूर येथील विद्युत मंडळांच्या डि.पी नादुरुस्त.प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अभियंता चाटे साहेब यांची भेट घेऊन त्वरित डि.पी.उपलब्द करुन द्यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना शहर प्रमुख संजय जोशी, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्कर प्रमुख भागवत पाटील सोमुरकर किनी येथील शिवसेनेचे शाखाप्रमुख उत्तम रेड्डी, लिंबा येथील शिवसेना शाखाप्रमुख गुत्ते, लिंबा/ कोटेकल्लूर येथील सरपंच पाटील आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# बऱ्हाणपूर-आंबेदा येथे दुर्गामातेचे जल्लोषात आगमन

## ग्रामस्थांच्या एकतेतून दुर्गोत्सवाला नवी ऊर्जा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**डहाणू - प्रतिनिधी**
**सुधीर घाटाळ**



**डहाणू :** डहाणू तालुक्यातील बऱ्हाणपूर-आंबेदा गावात दुर्गामातेचे आगमन मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात झाले. सजवलेल्या मंडपात देवीची मूर्ती आणून गुरुजी अमोल पुंजारा यांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठापना विधी पार पडला. ढोल-ताशांच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय आणि मंगलमय वातावरणाने दुमदुमला.

गेल्या १३ वर्षांपासून ग्रामस्थ सामूहिकपणे दुर्गोत्सवाचे आयोजन करतात. या काळात महिलांसाठी संगीत खुर्ची, खेळ पैठणी यांसारखे मनोरंजक उपक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जातात. गावातील ऐक्य दृढ करण्यासह सामाजिक भान जागवण्याचे कार्य या उत्सवातून होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. या सोहळ्याला दरवर्षी आदिवासी नेते व शिवसेना (शिंदे गट) चे उपनेते जगदीश धोडी यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभते. महिलांना साडी, लुगडे व कपडे वाटप करून त्यांना मार्गदर्शन केले जाते.मंडळाचे पदाधिकारी अशोक वरठा, महादु वरठा, नरेश वरठा, दत्तु भोये, राजेश पऱ्हाड, रुतिक वरठा, भरत वरठा, संदेश गडग, रामश्री, राहूल, गोविंद गुहे, संजय सापटा, सचिन तुंबडा, स्वप्नील वरठा, मिना वरठा, सुरज कौले, ममता, अश्विनी, रंजना पऱ्हाड, सुरेखा, सुरेश, भाग्यश्री, प्रतिभा, सुरेश घोषे आणि ग्रामस्थांच्या सामूहिक परिश्रमामुळे हा उत्सव यशस्वीरीत्या पार पडला. ग्रामस्थांच्या एकतेतून साजरा होणारा हा दुर्गोत्सव धार्मिकतेसोबतच सामाजिक ऊर्जा व ऐक्याची प्रेरणा देणारा ठरतो.

# श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी येथे 'निर्धार समानतेचा' अंतर्गत घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा, याविषयी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**परभणी - प्रतिनिधी**



**परभणी :** आय.एल.एस विधी महाविद्यालय पुणे व श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी व स्विसएड युरोपियन युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय प्रशिक्षण शिबिर दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी प्राचार्य डॉ. एम. एल. धर्मापुरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. या शिबिरामध्ये संसाधन व्यक्ती म्हणून श्रीकांत लक्ष्मी शंकर व ॲड. श्रीमती कल्याणी विर्धे यांनी विविध प्रसंगामधून विद्यार्थ्यांना कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायद्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी सखी वन स्टॉप सेंटर परभणी येथील श्रीमती तेजस्विनी कांबळे यांचे देखील विशेष मार्गदर्शन लाभले. या सर्व कार्यक्रमामध्ये आय.एल.एस विधी महाविद्यालय, पुणे येथील दिपाली चव्हाण व श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी येथील प्रा. डॉ. ग्यानेंद्र फुलझलके व प्रा. डॉ. अनिता देशमुख यांच्या उपस्थितीत हे शिबिर यशस्वी करण्यात मोलाचा वाटा ठरला. महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विद्या जोंधळे, प्रियंका अदोडे यांनी प्रत्येकी एक बाल विवाह थांबून प्रशिक्षण सार्थक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हे रजनी मेश्राम, सुशांत भगत, राधा कालंके व रत्नदीप वाहूळे यांनी केले तसेच विद्यार्थ्यांच्या वतीने विद्या जोंधळे व राजेश कापूरे यांनी मनोगत व्यक्त केले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कमिटी नेमून कामे वाटून घेतली. यामध्ये सतीश अणवते, यश गायकवाड,गोविंद काळे, अभय कल्याणकर, अन्सारी मुख्तसिद, करण पाईकराव, तनुश्री पवार, सुप्रिया कांबळे, रोशनी लेकरिया, प्रियांका अडोदे, नंदिनी भोकरे, कौस्तुभ, विठ्ठल, निहाल, सानिका, सुजाता, श्रेया, स्वानंदी, भाग्यश्री, मनिषा, अरिका, वैष्णवी, सुजाता थोरात, श्रेया अवचार, गोपाल, अविष्कार, प्रकाश सरपाते, आकाश हिंगोले तसेच सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या सहभागातून शिबिर यशस्वी झाले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रांडुरंग शिंदे, कोमल तुकडे यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता मराठवाडा शिक्षण प्रसार मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सचिव आ.सतीशभाऊ चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य चंद्रशेखर नखाते, गोविंद कदम, मकदूम मोहिउद्दीन, संतोष बोबडे, ॲड. दीपक देशमुख, ॲड.अशोक शिंदे, संतोष इंगळे आदींनी शुभेच्छा दिल्या.


# औंध येथे नवरात्रोत्सवाचा जल्लोषात शुभारंभ

## मुळपीठ गड व गावातील मंदिरांत देवीची विशेष पूजा; भक्तांची पहाटेपासून गर्दी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
औंध - प्रतिनिधी
निहाल मणेर

**औंध :** ता. खटाव, जि. सातारा औंध येथे श्री यमाई देवीच्या नवरात्रोत्सवाचा शुभारंभ आज अत्यंत जल्लोषात झाला. नवरात्रोत्सवाच्या पूर्वसंध्येला गडावरील तसेच गावातील मंदिरांमध्ये गर्भगृहाची स्वच्छता, सजावट, लाईटिंग आदी कामे करून तयारी करण्यात आली. यामध्ये औंध देवस्थान समितीसह वंशपरंपरागत सातभाई, फकीर, सुखधरणे, पछाडे व आमले या पाच पुजारी यांचा मोलाचा सहभाग असतो. पहाटे तीन वाजता ब्रह्ममुहूर्तावर परिसरातील गावांमधून आलेल्या ज्योतींनी गडावर आगमन केले. गडावरील मंदिरात सुखधरणे घराण्याचे पुजारी तर गावातील मंदिरात फकीर घराण्याचे पुजारी व सहकाऱ्यांनी आई यमाईची विशेष पूजा केली.

ग्रामनिवासिनी आई यमाईची 'श्री नागवल्ली



स्वरूप पूजा' ऋषिकेश गुरव, रमेश सातभाई, अवधूत पछाडे व आनंद पछाडे यांनी साकारली. या पूजेत खाऊच्या पानांचा समावेश करून त्रिदोष संतुलनाचा आयुर्वेदीय संदेश देण्यात आला. भक्तांचे दुःख दूर होऊन त्यांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी असा भावार्थ या पूजेतून व्यक्त करण्यात आला. औंधमधील नवरात्रोत्सवाची परंपरा नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण राहिली आहे. गडावरील देवीला दररोज नेसवल्या जाणाऱ्या साड्यांची वाढती संख्या आणि गावातील मंदिरात सजवली जाणारी विविध स्वरूपे यामुळे हा उत्सव अनोखा ठरतो.

यमाई पूजेसोबतच औंधमधील मोरळाई, मोकळाई, तुकाई आणि श्री सटवाई मंदिरांतही विशेष पूजा पार पडतात. याशिवाय गुरव समाजातर्फे विविध सांस्कृतिक व धार्मिक उपक्रम राबवले जातात, अशी माहिती यमाई देवीचे परंपरागत पुजारी संदीप गुरव यांनी दिली. दरम्यान, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर औंध गावात दिवसरात्र भक्तांची रेंगाळती गर्दी दिसून येत आहे. भजन, कीर्तन, जागरण गीते व देवीच्या आरत्या यामुळे संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या पुढील दिवसांत विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महिला मंडळांचे उपक्रम आणि पारंपरिक खेळांचे आयोजन होणार असून भाविकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे.

# स्वस्थ नारी - सशक्त परिवार अभियानांतर्गत शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
प्रा.विजयकुमार दिग्रसकर



**नांदेड :** १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. याच अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात महिला पतंजली योग समिती, नांदेड यांच्या वतीने योग साधना शिबिरासोबत आरोग्य तपासणी शिबिर नुकतेच घेण्यात आले. श्री. गुरु गोबिंदसिंघजी स्मारक जिल्हा रुग्णालयाच्या वतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा चिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बा.सं.) डॉ. राजाभाऊ बुट्टे, एनसीडी नोडल अधिकारी डॉ. हनुमंत पाटील, आरएमओ डॉ. पुष्पा गायकवाड व डॉ. एच.के. साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरात एकूण ८५ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. महिलांचे उच्चरक्तदाब, मधुमेह तपासणीसह विविध रक्त तपासण्या (CBC, LFT, KFT, HBA1C) घेण्यात आल्या. या उपक्रमासाठी पतंजली योग समिती नांदेडच्या प्रांत संवाद महिला प्रभारी उर्मिला साजने, डॉ. दिपक हजारी, डॉ. वैजवाडे, विजय उदगीरकर, जगन्नाथ अमिलकंठ्वार, विठ्ठल कदम, हनुमंत ढगे, सौ. सुरेखा चिद्रावार यांची उपस्थिती लाभली. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. विखारुनिसा खान, शिल्पा सोनाळे, रूपा गजभारे, सुवर्णकार सदाशिव व सुरज वाघमारे यांच्या वैद्यकीय टीमने विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभून 'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' अभियान अधिक परिणामकारक ठरले.

# श्रीक्षेत्र शिऊर येथे संत संमेलन थाटात संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वैजापूर - प्रतिनिधी
अनिल सुर्यवंशी

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र शिऊर येथील शंकर स्वामी महाराज यांच्या मंगल कार्यालयात हे संत संमेलन संपन्न झाले. या संमेलनास धर्मरक्षक महंत रामगिरीजी महाराज सराला बेट, गोसेवक विदर्भ रत्नं संजय महाराज पाचपोर बुलढाणा, योगी दत्तनाथ




महाराज धुळे, सिद्धेश्वरजी अकोला, आनंद पांडेय नागपूर, धर्माचार्य मेटे महाराज, मधुसूदन महाराज, महंत पंढरीनाथ महाराज,महंत अभयानंद गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच गंगापूर, वैजापूर, कन्नड या तालुक्यातील २०० ते २५० किर्तनकार या संमेलनास हजर होते. या संमेलनाचे प्रास्ताविक पंढरीनाथ महाराज पगार यांनी केले तर ज्ञानेश्वर महाराज मधाने व तुकाराम महाराज गायके यांनी सुत्रसंचालन केले शेवटी आभार संत शंकर स्वामी संस्थानचे महंत सारंगधर महाराज भोपळे यांनी केले सामुदायिक पसायदानाने सांगता करण्यात आली.

# संतांच्या वाणीतून समाजाला ऐक्याचा संदेश

## शिऊर येथील संत संमेलन थाटामाटात संपन्न

### भक्तिरसात रंगले गाव – संतांच्या वाणीतून समाजातील ऐक्याचा संदेश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी
मोहन आखाडे

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील श्री क्षेत्र शिऊर येथे भव्य संत संमेलन थाटामाटात व भक्तिभावात संपन्न झाले. संतांच्या कीर्तन, प्रवचन, भजन व हरिनाम संकीर्तनाच्या सुरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गावात सर्वत्र 'जय जय राम कृष्ण हरी' चा गजर घुमत राहिला.




**संतांची मान्यवर उपस्थिती**

या संमेलनास धर्मरक्षक महंत रामगिरीजी महाराज (सराला बेट), गोसेवक विदर्भरत्न संजय महाराज पाचपोर (बुलढाणा), योगी दत्तनाथ महाराज (धुळे), सिद्धेश्वरजी (अकोला), आनंद पांडेय (नागपूर), धर्माचार्य मेटे महाराज, मधुसूदन महाराज, महंत पंढरीनाथ महाराज तसेच महंत अभयानंद गिरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. गंगापूर, वैजापूर आणि कन्नड या तालुक्यातील तब्बल २०० ते २५० किर्तनकार या संमेलनासाठी उपस्थित होते.

**कार्यक्रमाचे नियोजन**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंढरीनाथ महाराज पगार यांनी केले. ज्ञानेश्वर महाराज मधाने व तुकाराम महाराज गायके यांनी ओघवत्या शब्दांत सूत्रसंचालन करत संपूर्ण सभागृह भारावून टाकले. संत शंकर स्वामी संस्थानचे महंत सारंगधर महाराज भोपळे यांनी आभार मानले. संमेलनाची सांगता सामुदायिक पसायदानाने करण्यात आली आणि वातावरण भक्तिभावाने भारावून गेले.


**स्थानिकांचा उत्स्फूर्त सहभाग**

स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक संस्था आणि भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या संमेलनाचा लाभ घेतला. संतांच्या वाणीतून समाजातील एकोप्याचा, नैतिकतेचा व अध्यात्माचा संदेश देत हे संमेलन सर्वार्थाने यशस्वी ठरले.

# निमगाव केतकी येथील भोंग कुटुंबीयांच्या वतीने बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
इंदापूर - प्रतिनिधी
बापू बोराटे

**पुणे (इंदापूर) :** बैलपोळा या सणाला ग्रामीण भागात मोठं महत्व आहे, इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथील शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात सण साजरा केला आहे. आज आधुनिक युगात कृषी क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वात जास्त सुरू झाला असला तरी महाराष्ट्रात आजही हिंदू संस्कृतीनुसार पारंपारिक शेतीला महत्त्व दिले जाते. इंदापूर तालुक्यात



देखील बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठल्यामुळे आता ग्रामीण भागातील युवक हे बैलगाडा शर्यतीकडे वळले असून,खूप मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागामध्ये पशु प्रेमी झाले आहेत. असेच निमगाव केतकी येथील भोंग कुटुंबीय यांच्याकडे असणारे बैलगाडा क्षेत्रातील मल्हार ०३०३ आणि नुकताच खरेदी केलेला वादळ ०३०३ या दोन्हीही बैलांना आकर्षक सजवून त्यांची परिसरामध्ये वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कुटुंबातील महिलांनी तसेच शेतकरी बांधवांनी सर्व बैलांची मनोभावे पूजा करुन कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी बैलजोडीला पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# सेवा पंधरवडा अभियानांतर्गत चिपळूणमध्ये भव्य रक्तदान शिबिर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
चिपळूण - प्रतिनिधी
स्वाती हडकर

**चिपळूण :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अभियानांतर्गत चिपळूणमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. भाजप नेते प्रशांत यादव यांच्या पुढाकाराने झालेल्या या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. नागरिक, कार्यकर्ते, पदाधिकारी, मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती या शिबिराला लाभली. प्रशांत यादव यांनी म्हटले, ङ्गरक्तदान हेच महादान', असा संदेश या उपक्रमाद्वारे समाजापर्यंत पोहोचवण्यात आला.



# जाहिर सूचना

दिनांक : २३/०९/२०२५

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्क करू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : जय चेम्बर, दुसरा मजला ऑफिस नं २०७, २०८ शिवाजी रोड स्वारगेट चौक पुणे, मो ९३७३५०४७४८




# आजचे राशि भविष्य






**मेष :** तुमची संध्याकाळ काहीशा मिश्र भावनांमुळे तणावाची ठरू शकते. परंतु, चिंता करण्याचे कारण नाही – कारण निराशेपेक्षा आनंद-समाधान यामुळे तुम्ही खुशीत राहाल.



**वृषभ :** आयुष्याकडे दुखी गंभीर चेह-याने पाहू नका. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका. गुंतवणुकीचा सर्व बाजूंनी विचार केल्याशिवाय पुढे जाऊ नका, अन्यथा नुकसान होऊ शकते.



**मिथुन :** दिवस भरत आलेल्या गर्भवती महिलांसाठी विशेष काळजीचा दिवस. दिवसभर जरी तुम्ही धन कमावण्यासाठी प्रयत्न करत असाल परंतु, संध्याकाळी तुम्हाला धन लाभ होऊ शकतो.



**कर्क :** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील



**सिंह :** तणावाकडे दुर्लक्ष करू नका. तंबाखूसेवन आणि मद्यसेवनासारखेच तणाव हाही संसर्गजन्य विकार आहे. तुम्ही मादक गोष्टींवर खर्च न करण्याचा तुम्हाला सल्ला दिला जातो.



**कन्या :** तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. जे लोक आपल्या जवळच्या किंवा नातेवाईकांसोबत मिळून बिझनेस करत आहे त्यांना आज खूप विचार करून पाऊल ठेवण्याची आवश्यकता आहे.



**तुळ :** तुमच्या सर्व अडचणी, समस्यांवर हसत हसत मात करणे हाच उत्तम उपाय ठरतो. व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.



**वृश्चिक :** मद्यपान करू नका, त्यामुळे आपली झोप बिघडू शकते आणि चांगल्या विश्रांतीपासून तुम्ही दूर जाता.



**धनु :** अति चिंतेने आणि तणावामुळे हायपरटेन्शन वाढेल. आजचा दिवस जगून घेण्याच्या आणि करमणुकीवर अति खर्च करण्याच्या आपल्या स्वभावाचे परीक्षण करा.



**मकर :** तुमचे आरोग्य आणि ऊर्जा बचतीची सवय तुम्हाला दीर्घ काळ प्रवासाच्या योजनेसाठी फायदेशीर ठरेल. अतिशय व्यस्त असूनही तुम्ही आरोग्य चांगले राखल्यामुळे थकवा येणार नाही.



**कुंभ :** इतरांविषयी शेरेबाजी करताना किंवा गृहितके ठरविताना त्यांच्या भावना समजून घ्या. तुमच्याकडून घेतलेला एखादा चुकीचा निर्णय संबंधितांवर विपरीत परिणाम करण्याबरोबरच तुम्हाला मानसिक तणावात टाकणारा ठरेल.



**मीन :** आज तुम्हाला तुमचे आरोग्य राखण्यासाठी आणि चांगेल दिसावे यासाठी प्रयत्न करायला खूप भरपूर मोकळा वेळ मिळेल.

# हे तुम्हांला माहिती आहे का ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



१. मानवी मेंदूत सुमारे ८६ अब्ज न्यूरॉन्स असतात.

२. जगातील सर्वात जुने झाड ४,८५० वर्षांचे आहे आणि ते कॅलिफोर्नियात आहे.

३. ऑक्टोपसला तीन हृदये असतात.

४. चीनची भिंत अंतराळातून नुसत्या डोळ्यांनी दिसत नाही.

५. शहामृगाचे डोळे त्याच्या मेंदूपेक्षा मोठे असतात.

६. मध कधीही सडत नाही – हजारो वर्षांनीही खाण्यायोग्य राहतो.

७. पृथ्वीवरील सर्व मुंग्यांचे एकत्रित वजन कधी काळी मानवांच्या एकत्रित वजनाएवढे होते.



८. दर सेकंदाला १०० वीजा पृथ्वीवर पडतात.

९. शार्क माश्या पृथ्वीवर झाडांपेक्षा आधी आल्या.

१०. आपल्या जीभेवर साधारण ८,००० टेस्ट बड्स असतात.

११. एका ताऱ्याचा प्रकाश आपल्यापर्यंत पोचायला हजारो वर्षे लागू शकतात.

१२. जगातील सर्वात लहान पक्षी हम्मिंगबर्ड फक्त २ ग्रॅम वजनाचा असतो.

१३. मानवी शरीरातील रक्तवाहिन्या सरळ लावल्या तर त्या ९९,००० किलोमीटर लांब होतील.

१४. जगातील सर्वात जास्त भाषांमध्ये अनुवाद झालेलं पुस्तक म्हणजे बायबल.

१५. दररोज साधारण ३० कोटी फोटो फेसबुकवर अपलोड होतात.

**✻ टीप : वरील माहितीची दैनिक चालु वार्ता वृत्तपत्र कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही**

# बांधकाम कामगारांना किचन सेट व सुरक्षा किट वाटप ग्रामपंचायत स्तरावर करावे –कामगारांची मागणी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उदगीर - प्रतिनिधी**
**अविनाश देवकते**



## अनुचित घटना टाळण्यासाठी व त्रास कमी करण्यासाठी मुख्यमंत्री व कामगार मंत्र्यांकडे ई–मेलद्वारे साकडे

**लातूर (उदगीर) :** राज्य शासनाच्या वतीने शहरी व ग्रामीण भागातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी गृहोपयोगी साहित्य किचन सेट व सुरक्षा किट तसेच शिष्यवृत्ती वाटपाची योजना राबविण्यात येत आहे. मात्र सदर वाटप जिल्ह्याच्या ठिकाणी, तसेच लातूर शहरापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर हरंगुळ बुद्रुक एमआयडीसी परिसरातील गोडाऊन येथे होत असल्यामुळे बांधकाम कामगारांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. याठिकाणी हजारो नोंदणीकृत कामगार साहित्य मिळविण्यासाठी सकाळी पहाटेपासून रांगेत उभे राहत असून, अनेक वेळा १८–१८ तास थांबावे लागत आहे. काहींना तर रात्रभर महामार्गावर किंवा गोडाऊन परिसरात झोपावे लागत असल्याचे चित्र दिसून येते. वाटप केंद्रावर नियोजनाचा अभाव असल्याने अपेक्षेपेक्षा कितीतरी पट कामगार उपस्थित होत आहेत, परिणामी प्रचंड गर्दी, गोंधळ आणि अनुचित घटना घडल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. गेल्या सहा–सात महिन्यांपासून साहित्याचे वाटप रखडलेले असल्याने कामगारांचे हाल अधिकच वाढले आहेत. त्यामुळे आता गृहोपयोगी किचन सेट व सुरक्षा किटचे वाटप जिल्हा किंवा तालुका ठिकाणी न करता थेट ग्रामपंचायत स्तरावर करावे, अशी मागणी परिसरातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकडून करण्यात आली आहे. या संदर्भात अखिल भारतीय बांधकाम संघटना शाखा अतनूरचे शाखाध्यक्ष चंद्रप्रकाश गायकवाड, महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार व कर्मचारी काँग्रेस शाखा अतनूरचे शाखाध्यक्ष अमोल गायकवाड, राष्ट्रीय मजदूर संघ मराठवाडा विभाग अध्यक्ष एस.जी. शिंदे अतनूरकर, उबाठा शिवसेनेचे जळकोट तालुकाप्रमुख विकास पाटील, अतनूरचे सरपंच चंद्रशेखर पाटील, गव्हाणचे सरपंच बालाजी गुडसुरे, मेवापूरच्या सरपंच सौ. कोमल तुळशीदास पाटील, गुत्तीच्या सरपंच सौ. मीना यादव केंद्रे, चिंचोलीच्या सरपंच रेखा बिरादार, माजी सरपंच संतोष बट्टेवाड यांसह अनेक मान्यवरांनी आवाज उठविला आहे.

कामगारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगार मंत्री आकाश फुंडकर, प्रधान सचिव कुंदन मॅडम, उपसचिव कापडणीस, सचिव विवेक कुंभार, कामगार उपायुक्त तसेच सहाय्यक कामगार उपायुक्त मंगेश झोले (लातूर) यांना ई–मेलद्वारे मागणी सादर केली आहे. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास, सहाय्यक कामगार उपायुक्त कार्यालय, लातूर येथे येत्या २ ऑक्टोबर (महात्मा गांधी जयंती) पासून बेमुदत आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा बांधकाम कामगारांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# तळेगांव(शा.पंत) येथे नवरात्रीत नऊ दिवसांची अखंड ज्योती स्थापना

## धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाची रेंलचेल

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वर्धा - उपसंपादक**
**अवधूत शेंद्रे**



**वर्धा - आष्टी :** तालुक्यातील तळेगांव (शा.पंत)–येथील दुर्गा माता मंदिरामध्ये प्रसिद्ध नऊ दिवसाची अखंड ज्योतीची स्थापना करण्यात येणार असल्याचे सूत्रांने कळविले आहे त्यानुसार आजपासून अश्विन नवरात्र उत्सव घटस्थापना आणि अभिषेक व होम पूजा यांनी अश्विन शुद्ध प्रतिपदा रोज सोमवारला ते आश्विन शुद्ध नवमी रोज बुधवार दिनांक एक १ आक्टोबर २५ पर्यंत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला मोठी रेलचेल राहणार असून ९ दिवस कार्यक्रमांची मोठी भक्तांची गर्दी राहणार आहे सोमवारला सकाळी सहा वाजता दुर्गामातेचा अभिषेक करून घटस्थापना करण्यात येईल सौ पूजा व आशिष मांडेकर यांच्या शुभहस्ते हा कार्यक्रम पार पडणार आहे त्यानंतर सायंकाळी सहा वाजता अखंड ज्योती दीप प्रज्वलन सौ. क्षितिजाताई व आमदार सूमित वानखेडे यांच्या हस्ते पार पडणार आहे यावेळी पंजाबराव खेरडे संस्थापक अध्यक्ष दुर्गा माता देवस्थान तळेगाव यांचे प्रमुख उपस्थिती राहणार आहे तसेच बाबूजी लढ्ढा विश्वस्त यांची सुद्धा उपस्थित राहणार आहे सायंकाळी सात वाजता महाआरती व देवीचा गोंधळ राहणार आहे.

नवरात्रीच्या नऊ दिवसांत रोज पहाटे पाच वाजता होणाऱ्या महाआरतीचा मान सोमवारी सौ पूजा व आशिष मांडेकर मंगळवारी सौ योगीता व विशाल गाडगे, बुधवारी सौ सविता व निलेश बंगाले, गुरुवारी सौ भारती व सतीश खेरबडे, शुक्रवारी सौ अपर्णा व शैलेश दिंडेकर, शनिवारी सौ मनीषा व सचिन गावंडे, रविवारी सौ रिद्धी व अर्जुन भट्टड, सोमवारी सौ प्रतीक्षा व आशिष खंडागळे, मंगळवारी सौ मंगला व प्रमोद चोहटकर व बुधवारी सौ जयश्री व आनंद भालेराव या दहा जोडप्यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी होणाऱ्या महाआरतीचा मान अनुक्रमे सौ अंकिता व सचिन होले, सौ हरविंदर व रोमी भिंडर, सौ सुनीता व दिलीप राठी, सौ पुजा व मंगेश भोयर ठाणेदार, सौ हर्षा व जयदादा बेलखडे, सौ वैशाली व अनंत मोहोड, सौ पदमा व दिलीप निंभोरकर, सौ वंदना व सुधीर गाडगे, यांना देण्यात आला आहे. बुधवारी गोपाल काल्याचे किर्तन ह भ प हरी ओम महाराज निंभोरकर वारकरी भजन मंडळ तळेगाव (श्या.पंत) यांच्या द्वारा खासदार अमर काळे आमदार दादाराव केचे व सरपंच छबुताई खंडार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे तर तीर्थ उठवने प्रवीण करोले यांच्या हस्ते होणार आहे दुपारी एक ते पाच वाजेपर्यंत महाप्रसाद होणार असून सायंकाळी साडेपाचला ज्योत विसर्जनाची भव्य दिव्य मिरवणूक निघणार आहे. करिता परिसरितलाती सर्व दुर्गा भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व या कार्याकरिता तन मन धन सहकार्य करावे असे आवाहन श्री दुर्गा माता संस्थान तळेगाव यांनी केलेले आहे.

**नवरात्रीत भजन मंडळाची सेवा**

सदर ठिकाणी नऊ दिवस भजने राहणार असून यासाठी गण निवासीनी महिला भजन मंडळ तळेगाव राष्ट्रसंत परिवार भजन मंडळ आष्टी अहिल्यादेवी भजन मंडळ तळेगाव संत लहानजी बाबा भजन मंडळ जळगाव श्री गुरुदेव महिला भजन मंडळ तळेगाव सद्गुरु भजन मंडळ वागदा पुनर्वसन आर्वी राधाकृष्ण महिला भजन मंडळ वर्धा मंत्री अवधुती भजन मंडळ तळेगाव स्वरांजली महिला भजन मंडळ तळेगाव संत आयाबुवा महिला भजन मंडळ वर्धा मंत्री विघ्नहर्ता महिला भजन मंडळ वर्धा मंदिरी वारकरी भजन मंडळ तळेगाव इत्यादींचा सहभाग असणार आहे.

**दोन दिवस राहणार गरब्याचा थरार**

नवदुर्गा गरबा ग्रुप कुमारी प्रणाली टर्के व संच समता सखी गरबा ग्रुप सौ.निकिता वानखडे व संच रणरागिनी गरबा ग्रुप वैष्णवी लोखंडे वसंत व परिसरातील वेळेवर येणारे गरबा ग्रुप यांचा कार्यक्रम हा दोन दिवस असणार आहे तर एक दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे ज्यांना यामध्ये भाग घ्यायचा असेल त्यांनी दर्शन दुर्गे व योगेश दिग्रसे यांच्याशी संपर्क साधावा.

अखंड दीप प्रज्वलनसाठी आमदार सुमीत वानखेडे यांची सपत्नीक उपस्थिती अखंड दीप प्रज्वलन सौ क्षितिजा व आमदार सुमीत वानखडे यांच्या हस्ते दुर्गामाता देवस्थान चे कार्यकारी अध्यक्ष अनिल बुले यांच्यासह विश्वस्त पंजाबराव खेरडे व बाबूजी लढ्ढा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.एकंदरीत नवरात्रीत संपूर्ण दहा दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमाची मोठी रेलचेल राहणार असुन भाविकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हाहन दुर्गामाता देवस्थान चे कार्यकारी अध्यक्ष अनिल बुले व सर्व विश्वस्थानी केले आहे.

# ‘ऑपरेशन सिंदूर’ भारतासाठी अस्तित्वाची लढाई - विंग कमांडर औताडे

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वाघोली - प्रतिनिधी**
**स्वरुप गिरमकर**




**(पुणे) वाघोली :** भूमी फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य संचालित आत्महत्याग्रस्त शेतकरी कन्या निवासी प्रकल्प वाघोली पुणे येथे २० सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रपती शौर्यपदक प्राप्त आणि ‘ऑपरेशन सिंदूर’ राबविण्यात यशस्वी झालेले भारतीय वायुसेना दलाचे विंग कमांडर ऑफिसर देवेंद्रजी औताडे यांनी भेट दिली. या प्रसंगी विंग कमांडर देवेंद्रजी यांनी प्रथम आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील गरजू, निराधार मुलींसाठी कार्य करीत असल्याने संस्थापक अध्यक्ष डॉ.कैलास पवार आणि सर्व पदाधिकारी यांचे अभिनंदन केले.तसेच आज समाजात चांगलं काम करणाऱ्यांची अत्यंत गरज असून दुसऱ्याचे परिवर्तन करण्यापेक्षा स्वतःचे परिवर्तन करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर भारतीय वायुसेनेच्या माध्यमातून ‘ऑपरेशन सिंदूर‘भारतासाठी अस्तित्वाची लढाई आहे.भारताची सेना खूप मजबूत आणि भक्कम असून आपल्या सर्व देशवासीयांच्या शुभेच्छा सोबत असल्याचे म्हटले आहे .संस्थेचे पदाधिकारी आणि पोलीस विभाग, व पुण्यातील माजी सैनिक अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष डॉ.कैलास पवार यांनी केले. यावेळी वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांनी विंग कमांडर औताडे यांचा सन्मान केला. तसेच या प्रसंगी त्यांच्या कार्याचे कौतुक करीत भारतीय सेना मजबूत असल्याचं मत व्यक्त केले. यावेळी डॉ.अमित कुमार दुबे, कॅप्टन जे के अरविंद, डॉ.अविनाश शर्मा, एस के पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ईश्वर मापारी यांनी आपल्या त्रिशा या मुलीच्या दुसऱ्या वाढदिवसाच्या निमित्ताने निवासी प्रकल्पाला साऊंड सिस्टम भेट दिली. संस्थेच्या डायरेक्टर अध्यापिका अनिता पवार आणि कृषक कन्या यांनी आभार मानले. यावेळी पो.अं. बाळासाहेब हराळ, पो.शामबाला पांडव, पो.निकिता भापकर, पो.अंजली नवले, पो.प्रिया राऊत, पो.राहुल उगले, पो.सिद्धार्थ ढवळे, राजन खेडेकर, शर्माजी, सौ. देशमुख ताई, अशोक थोरात, चेअरमन गणेश देसाई, सुदर्शन पाटील,अनिरुद्ध बोचरे याबरोबर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# जनमाता देवस्थानच्या विकास कामासाठी निधी देण्याचे दिले आश्वासन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**चाकूर - प्रतिनिधी**
**किशन वडारे**



## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते खुर्दळी येथे जनमाता आईची घटस्थापना

**चाकूर :** तालुक्यातील आई जनमाता देवस्थानसाठी लागेल तेवढा निधी देऊन मंदिराचा विकास घडवून आणणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्यातील खुर्दळी येथे केले. मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते तालुक्यातील खुर्दळी येथे येथील आई जनमाता देवस्थानची घटस्थापना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवाजीराव काळे, भानुदासराव पोटे, यशवंतराव जाधव, दयानंदराव सुरवसे, सरपंच प्रचिताताई भोसले, दैनिक सकाळचे पत्रकार विकास गाढवे, ॲड. संतोष गंभीरे, अनिलराव वाडकर, अशोकराव कर्डिले, संदीप शेटे, संगम जनगावे, ॲड. श्रीनाथ सावंत, विवेकानंद शिंदे, शशिकांत शिंदे, कासिम भाई पटेल, जलीलसाब पटेल, बाबुभाई दिवाणजी, अलीम पटेल, अध्यक्ष शरद पाटील, उपाध्यक्ष ज्ञानोबा जाधव, पांडुरंग शिंदे, अमर पाटील तसेच हाळी खुर्द गावचे सर्व ग्रामस्थ, महिला भगिनी यावेळी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना बाबासाहेब पाटील म्हणाले की, आई जनमाता मंदिराचे महत्व अनादी काळापासून आहे. मतदारसंघाचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असून, मतदारसंघ सुजलाम सुफलाम करण्याची प्रार्थना आई जनमाता कडे करणार असल्याचे सहकार मंत्री पाटील म्हणाले.

# कावळगावचा भूमिपुत्र आकाश घंटे याची राज्य कर निरीक्षक (STI) पदी निवड...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**देगलूर - प्रतिनिधी**
**संतोष मंनधरणे**



सामाजिक कार्यकर्ते कैलास येसगे व गावकऱ्यांनी केला सत्कार...

**देगलूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग–२०२४ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा परवा निकाल जाहीर झाला. यामध्ये देगलूर तालुक्यातील कावळगावचा भूमिपुत्र आकाश वीरभद्र घंटे याची राज्य कर निरीक्षक पदी निवड झाली. अत्यंत गरीब व हालाखीच्या परिस्थितीतून खडतर मेहनतीच्या जोरावर आकाश घंटे यांनी हे यश प्राप्त केल्यामुळे संपूर्ण परिसरात त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे. वडिलांकडे एक गुंठा जमीन नसतानाही उद्योग व्यवसाय करत त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना चांगल्या शिक्षणाचे धडे दिले. मोठा मुलगा डाक विभागामध्ये कार्यरत असून २०२३ मध्ये आकाशची निवड तलाठी पदावर झाली होती. तलाठीची नोकरी सांभाळत सांभाळतच आकाशने एमपीएससीचा अभ्यास सातत्याने चालू ठेवून हे यश प्राप्त केले.

कावळगाव नगरीचे भूमिपुत्र, सामाजिक कार्यकर्ते कैलास येसगे कावळगावकर यांनी पुढाकार घेत गावातील इतर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरावे यासाठी आकाश घंटे याचे संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने स्वागत सत्कार करून कौतुक केले. या स्वागत समारंभाप्रसंगी आकाशचे वडील वीरभद्र घंटे, मोठे बंधू शिवकुमार घंटे, पाहुणे दत्तात्रय टोंपे, गावकरी सदाशिव झेंगाडे, रमेशराव नागलगावे, सूर्यकांतराव येसगे, शिवकुमार शिवपुजे, गंगआप्पा स्वामी, मल्लिकार्जुन गोपछेडे, हावगी बिरादार, चनबस नागलगावे, संतोष शिवपुजे, संतोष हेडगुळे, शिवलिंग येसगे, बसवंत पटणे, महादेव येसगे, पत्रकार मिलींद कावळगावकर, मन्मथ हासगुळे, सूर्यकांत शिंदे, शिवराज बिरादार, प्रभाकर लगडे, वीरभद्र बिरादार, शिवदास बिरादार, शंकर येमे, संग्राम बिरादार, संतोष लंजवाडे, बालाजी शिंदे, ज्ञानेश्वर बंडेवाड, दत्ता शिंदे व गावातील तरूण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत नवसाक्षरांची मूल्यमापन चाचणी उत्साहात संपन्न

## अंबुलगा केंद्रावर १० परीक्षार्थ्यांचा शंभर टक्के सहभाग

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पेठवडज सर्कल- प्रतिनिधी**
**सूर्यकांत पैनापल्ले**



**अंबुलगा (ता. कंधार) :** साक्षर समाज म्हणजे प्रगत समाज या घोषवाक्याला सत्यात उतरवत नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत नवसाक्षरांची मूल्यमापन चाचणी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, अंबुलगा येथे मोठ्या शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. या चाचणीत एकूण १० परीक्षार्थींची नोंद होती आणि विशेष म्हणजे सर्वच १० परीक्षार्थी उपस्थित राहून शंभर टक्के हजेरीची नोंद झाली. ग्रामीण भागातील जनतेत साक्षरतेबाबत निर्माण झालेली जागरूकता या उपस्थितीतून स्पष्टपणे दिसून आली. चाचणीचे केंद्रसंचालक म्हणून एम.एम. पांचाळ यांनी परीक्षेचे सर्व नियोजन काटेकोरपणे केले. परीक्षेच्या शिस्तीची व कार्यपद्धतीची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडली. तर पर्यवेक्षक म्हणून ए. डी. गुद्दे यांनी देखरेख करून संपूर्ण परीक्षाप्रक्रिया शांत, सुबक व सुरळीत पार पडली याची काळजी घेतली. परीक्षा देण्यासाठी आलेल्या नवसाक्षरांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. वाचन, लेखन व गणिताच्या प्राथमिक कौशल्यांची चाचणी या माध्यमातून घेण्यात आली. आयुष्यात प्रथमच परीक्षा देण्याचा अनुभव घेत असलेल्या काही परीक्षार्थ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रूही दाटले होते. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धातदेखील शिक्षण घेण्याची आस धरलेल्या या परीक्षार्थ्यांचे प्रयत्न कौतुकास्पद ठरले. स्थानिक शैक्षणिक अधिकारी, शिक्षकवर्ग आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. समाजातील प्रत्येक घटकाला साक्षरतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या कार्यक्रमाचे महत्व अधोरेखित करण्यात आले. अंबुलगा केंद्रावर झालेली शंभर टक्के उपस्थिती ही संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी बाब ठरली आहे. या उपक्रमाद्वारे निरक्षरतेचे निर्मूलन करून साक्षर भारत घडविण्याचे सरकारचे उद्दिष्ट अधिक भक्कमपणे साध्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# जीवन समृद्धी परिवाराची मीटिंग वैजापूर वनश्री हॉटेल येथे थाटामाटात पार पडली

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वैजापूर - प्रतिनिधी**
**अनिल सूर्यवंशी**



**वैजापूर :** छ. संभाजी नगर विभागाचे CLIA मॅनेजर एम. एम. पेंदे, शाखा अधिकारी मुकुंद ठाकूर, शाखा अधिकारी महेंद्र भारती, CLIA अर्जुन गायकवाड तसेच MDRT USA विलास थोरात ह्यांनी जीवन समृद्धी परिवारातील विमाप्रतिनिधी बंधू व भगिनींना अनमोल असे मार्गदर्शन दर्शन केले तसेच खूपच सुंदर आणि सोप्या, सरळ भाषेत समजून सांगितले सर्व पाहुण्यांनी सांगितलेल्या टिप्स चा फायदा lic चा व्यवसाय वृद्धिंगत होण्यास मदत होईल. जीवन समृद्धी परिवारा तर्फे सर्व प्रमुख मार्गदर्शक CLIA पेंदे सर तसेच प्रमुख अतिथी वैजापूर शाखा अधिकारी ठाकूर, वैजापूर शाखा अधिकारी भारती, CLIA अर्जुन गायकवाड व MDRT विलास थोरात सर्व मान्यवरचे जीवन समृद्धी परिवारातर्फे पुन्हा एकदा हार्दिक आभार व धन्यवाद.

# महाराष्ट्र शासनाच्या सेवा पंधरवाड्यात दिव्यांगांना घरपोच धान्य वितरण

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वर्धा - उपसंपादक**
**अवधूत शेंद्रे**

**वर्धा - आष्टी :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म दिनांक १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ आक्टो २५ या कालावधीत पंधरवडा साजरा करण्यात येत आहे त्यानिमित्ताने तालुक्यातील सुजातपूर येथील स्वस्त धान्य दुकानदार प्रवीण ठाकरे दिव्यांग शिधापत्रिकाधारकांना घरपोच धान्य वितरण करीत आहे त्यामुळे प्रवीण ठाकरे यांचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.



# दत्ता पाटील यांची छावा संघटनेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

## कार्यकर्त्यांच्या संघर्षाची दखल; सत्कार आणि शुभेच्छांचा वर्षाव

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उदगीर - प्रतिनिधी**
**अविनाश देवकते**



**लातूर (उदगीर) :** दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी रविवारी दत्ता पाटील यांची छावा संघटनेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाली. या नियुक्तीनंतर सर्व स्तरातून त्यांच्या कार्याचे कौतुक होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दीर्घकाळाच्या संघर्षातून आणि संघटनेतील चांगल्या कामगिरीच्या जोरावर त्यांना जिल्हाध्यक्षपदी निवडण्यात आले. नियुक्तीबद्दल संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी दत्ता पाटील यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. संभाजी ब्रिगेड नेहमीच समाजकार्यात अग्रेसर राहिली आहे. कोणत्याही क्षेत्रात आणि कोणत्याही समाजातील चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तीचा संघटना सत्कार करून त्यांचे मनोबल वाढवते, असे मत या वेळी मांडण्यात आले.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शिवश्री राजकुमार माने म्हणाले की, 'संभाजी ब्रिगेड ही वंचितांच्या प्रश्नाला वाचा फोडणारी संघटना आहे. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन लढणारी ही ताकद आहे. आगामी सर्व निवडणुकांत संभाजी ब्रिगेडकडून उमेदवार देण्याची तयारी सुरू आहे.' यावेळी जिल्हाउपाध्यक्ष व पत्रकार शिवश्री उत्तम फड, जिल्हा सचिव शिवश्री मोहनेश्वर विश्वकर्मा, जिल्हा कार्याध्यक्ष शिवश्री श्रीधर जाधव, तालुकाध्यक्ष शिवश्री राजकुमार भालेराव, रामदास माळेगावे, प्रदीप ढगे, जयवंतराव बिरादार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# तांडा वस्ती सुधार योजनेसाठी उमरा ग्रामपंचायतला ५०लक्ष रुपयांचा निधी मंजूर

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उस्माननगर - प्रतिनिधी**
**लक्ष्मण कांबळे**




**नांदेड/उस्माननगर :** लोहा कंधार विधानसभा मतदार संघातील तांड्यांचा सर्वांगीण विकास करण्या करिता महायुती सरकारच्या माध्यमातून वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार व जिल्हा नियोजन विकास योजनेच्या माध्यमातून उमरा ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या ढगारी तांडा, परसराम तांडा, धनजी तांडा, फूलमळा तांडा व भिमला तांडा या पाच तांड्याना प्रत्येकी १० लक्ष रुपये असे एकूण ५० लक्ष रुपयांचा विकास निधीचे पत्र लोहा - कंधार विधान सभेचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणिताताई चिखलीकर - देवरे यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. यावेळी माजी सभापती- आनंदराव पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य- गणेश पाटील सावळे, भगवान राठोड, सरपंच- साईनाथ पवार, राजेश सिरसाट, शामराव राठोड, बालाजी पवार, यांच्यासह उमरा ग्रामपंचायतीचे सदस्य व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिराढोण विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाच्या वतीने स.पो.नि. संजय निलपत्रेवार यांचा सत्कार करण्यात आला

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**शिराढोण - प्रतिनिधी**
**गजानन देवणे**



**शिराढोण :** उस्माननगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांनी गुन्हे निर्गती, ई-साक्ष यंत्रणा तसेच हरवलेल्या एकूण १५ महिला व पुरुषांचा शोध एका महिन्यात घेऊन जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त नांदेड येथील कुसुम सभागृहात मीमांसा फाउंडेशन आणि राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने जिल्ह्यातील पोलिस, समाजसेवा व शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना पुरस्कार देण्यात आला. उस्माननगर पोलिसांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत संजय निलपत्रेवार यांना सन्मानपत्र आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात आले होते त्याचे औचित्य साधून तसेच उस्माननगर पोलिस स्टेशनच्या धाडसी व कर्तृत्ववान महीला सपोउनि सौ. लोपामुद्रा आनेराव-कुबडे या नुकत्याच आफ्रिका खंडातील टांझानिया देशातील किलोमांजारो या उंच शिखरावर दि. १५ ऑगस्टला पोहचून त्यांनी तिरंगा फडकावला आहे. या धाडसी व कर्तृत्ववान महीला अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दै.आनंदनगरी चे उपसंपादक संगमेश्वर बाचे, शिराढोण विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघांचे अध्यक्ष शुभम डांगे, दै चालु वार्ताचे गजानन देवणे, दै. लोकमतचे ईश्वर पांडागळे, दै. प्रजावणी चे शिवकांत डांगे सह पोलीस कर्मचारी सुशील कुबडे, ज्योती सांगविकर, निल्लपा शिवपुजे, शंकर पांडागळे, भगवान पांडागळे आदींची उपस्थित होते.

# नातेपुते येथे मोठ्या अद्भुतपूर्व उत्साहात दुर्गा माता दौडला प्रारंभ

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**माळशिरस - प्रतिनिधी**
**राजेंद्र पिसे**



**नातेपुते :** नातेपुते येथे मोठ्या अद्भुतपूर्व उत्साहात दुर्गा माता दौडला सुरुवात घटस्थापनेपासून प्रारंभ झाला आहे नातेपुते येथे काही वर्षांपूर्वी म्हणजे २०१६ साली गावातील पाच ते सहा तरुणांनी या दुर्गामाता दौडीची सुरुवात केली त्याला आता व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे सुरू असलेल्या दौडीमध्ये दररोज देशभक्तीपर गीते पोवाडे म्हणण्यात येत आहेत तर राष्ट्र धर्म अभिमान जागवणाऱ्या घोषणा देण्यात येत आहेत दुर्गा माता की जय, जय भवानी जय शिवाजी, जय श्रीराम भारत माता की जय अशा घोषणा देऊन वातावरण शिवमय होत आहे या दौडमध्ये सुमारे शंभर होऊन अधिक धर्मप्रेमी दररोज सहभागी होतात. अनेक तरुण-तरुणी, लहान मुले पारंपारीक वेशभुषेत सहभाग दररोज पहाटे ६ वाजता श्री रेणुका माता मंदिर, कन्या शाळा बुरजाजवळून दौडीला प्रारंभ होतो दौड पथकातील युवती आणि दौडमध्ये सहभागी तरुणांचे नातेपुते नगरीतील महिलांन कडून रस्त्यावर रांगोळी काढून आणि आरती करून ठिकठिकाणी फटाक्याची आतिषबाजी करून फुलांच्या पाकळ्याची उधळण करत भक्तिमय वातावरणात स्वागत होत आहे व दसऱ्या दिवशी गावांमधून दुर्गा माता दौड मोठ्या प्रमाणात मिरवणूक निघते. समस्त ग्रामस्थ समाज बांधव स्वागत करतात व सहभागी होतात. देव देश आणि धर्माच्या रक्षणासाठी सर्व ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षी घटस्थापना ते दसरा दरम्यान दुर्गामाता दौडचे आयोजन केली जाते या दुर्गामाता दौडीला प्रारंभ झाला असून दसऱ्यापर्यंत दुर्गा माता दौड चालणार आहे राष्ट्रीयभक्ती धर्म भक्तीच्या मार्गावर जोमाने चालण्याचे बळ आणि तरुण पिढी सशक्त निर्व्यसनी राष्ट्रीयभक्त बनण्यासाठी दुर्गामाता दौंड मध्ये नातेपुते गावातील सर्व ग्रामस्थ भाविकांनी तरुणांनी सहभागी व्हावे असे मत दुर्गामाता दौडीच्या तरुणांकडून व्यक्त होत आहे.

# इगतपुरी तालुक्याचे ग्रामदैवत घाटनदेवी येथे घटस्थापना व नवरात्रोत्सव यात्रेचा आरंभ

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**इगतपुरी - प्रतिनिधी**
**विकास पुणेकर**





**इगतपुरी :** इगतपुरी तालुक्याचे ग्रामदैवत म्हणुन ओळख असणाऱ्या थळघाटातील शैलपुत्री घाटनदेवी मातेच्या मंदिरात आज मोठया उत्साहात घटस्थापना करण्यात आली.त्याचबरोबर पारंपारीक रितीरिवाजानुसार शारदीय नवरात्रोत्सवाला मंगलमय व अत्यंत भक्तीमय वातावरणात आरंभ करण्यात आला. गणेशोत्सवानंतर उत्सुकता लागुन असलेल्या नवरात्रोत्सवाच्या आजच्या पहील्याच दिवशी भाविकांनी उत्साहात दर्शन घेतले.आज घटस्थापनेसाठी इगतपुरी शहरासह पंचक्रोशीतील आणि विविध भागातील भाविकांनी घटी बसविण्यासाठी शिस्तीचे दर्शन घडवत घट बसवले.यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसुन आले.दरम्यान तालुक्याच्या विविध भागातुन दाखल झालेल्या भाविकांनी पहाटेपासुनच गर्दी केली होती.

**पोलीस निरीक्षक सारीका अहिरराव यांच्या हस्ते महापुजा :**

इगतपुरी तालुक्याचे आराध्य दैवत असणाऱ्या श्री घाटनदेवी मंदिर इगतपुरी येथे आज अश्विन नवरात्र महोत्सवानिमित्त घटस्थापना इगतपुरी पोलीस स्थानकाच्या निरीक्षक सारिका आहिरराव यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी मंदिर ट्रस्टचे भारत साळी, ओमप्रकाश तिवारी,ताराचंद भरिंडवाल, राजेश गुप्ता,शांताराम रिखे,रामगोविंद यादव , किरण फलटणकर तसेच विनोद गोसावी, निलेश देवराज, राहुल साळवे आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.यावेळी यात्रोत्सव यशस्वी होण्यासाठी सर्व भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले.

# कोकरसा येथे शारदीय नवरात्रोत्सवास सुरुवात

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**



**जालना (मंठा) :** तालुक्यातील श्री जगदंबा देवी कोकाबाई संस्थान, कोकरसा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होणार आहे. याचा प्रारंभ आश्विन शु. प्रतिपदा दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी सोमवारी सकाळी १०.३० वा. घटस्थापना व नशिकेत पाठवाचनाने होणार असून, हे विधी श्रीपाद शंकरराव साखरेकर महाराज यांच्या मंत्रोच्चाराने पार पडणार आहेत.

नवरात्र उत्सव काळात रोज पहाटे ४.०० वाजता काकडा भजन व हरिपाठ ह.भ.प. विठ्ठलराव वाघमारे व परिवार यांच्या वतीने होणार आहे. तसेच देवीची महाआरती सकाळी ८.३० वा., दुपारी १२.०० वा. आणि सायंकाळी ७.०० वा. करण्यात येणार आहे. दरम्यान, ललिता पंचमी दि. २६ सप्टेंबर रोजी विशेष भक्तिभावाने साजरी होणार आहे. तसेच होमहवन व पूर्णाहुती दि. ३० सप्टेंबर रोजी दुपारी १.०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ६.०० वाजता पार पडेल. नवरात्रोत्सव काळात दररोज रात्री ८.०० वाजता विविध गावांतील सांप्रदायिक भजनी मंडळांचा सहभाग राहणार आहे. यात जयपूर, एरंडेश्वर, बेलोरा, टाकळखोपा, पोखरी केंधळे, अंजनी खुर्द, कोकरसा-तुपा आदी भजनी मंडळांचा समावेश आहे. तसेच ह.भ.प. शिवाजी महाराज काकडे, ह.भ.प. सुधाकर महाराज जाधव, प.पु. श्रीकृष्ण चैतन्य महाराज निळकंठेश्वर, प.पु. दत्तात्रय महाराज राहेरीकर यांचे कीर्तन व भजन कार्यक्रम होणार आहेत. आई जगदंबेच्या नवरात्रोत्सवात सहभागी होऊन भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त समितीकडून करण्यात आले आहे.



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

महाराष्ट्र भाजपा नेते मा. सुधीर दिवे साहेबांना त्यांच्या नागपूर येथील निवासस्थानी जन्मदिनाच्या शुभेच्छा देतांना आष्टी तालुका भाजपाध्यक्ष सचिन होले पत्नी माजी जि.प.सदस्या अंकिता होले मुलगा स्वराज तर उजव्या बाजूने भाजयूवा मोर्चा चिटणीस विकास कोठे दै.चालु वार्ता वर्धा उपसंपादक अवधूत शेंद्रे आणि पत्नी स्वाती शेंद्रे.

# प्रा किशोर लहारे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**म्हसळा - प्रतिनिधी**
**अंगद कांबळे**



**म्हसळा :** श्रीवर्धन - गो. ऐ. सो. च्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, श्रीवर्धन. जि. रायगडचे उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख, प्रा. किशोर ना. लहारे. यांना शिक्षण, संस्कार व समाज हितासाठी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'रायगड जिल्हा स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ची. कोकण विभाग शिक्षक विभागाचे विद्यमान आमदार न्यानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते माधवबाग, खोपोली. येथे प्रदान करण्यात आला. प्रा किशोर लहारे महाविद्यालयात गेली २७ वर्षे अध्यापनाचे काम प्रामाणिकपणे आणि निष्ठेने करीत आहेत. महाविद्यालयात अध्यापना बरोबरच प्राचार्य, डॉ.श्रीनिवास जोशी यांचे बरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व इतर विविध समित्यांचे काम करताना विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून उल्लेखनीय कार्य करत आहेत. विद्यार्थी प्रिय शिक्षक, मितभाषी आणि विद्यार्थांबाबतची तळमळ असलेले एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून प्रा.किशोर लहारे ओळखले जातात. त्यांच्या या सन्मानाबद्दल संस्थेच्या सचिव, प्राचार्या, डॉ दीप्तीताई देशपांडे, संस्थेचे अध्यक्ष, डॉ.आर.पी. देशपांडे आणि संस्थेच्या कार्याध्यक्षा, प्राचार्या, डॉ. सुहासिनी संत, महाविद्यालय विकास समिती सदस्य, शातीलालजी जैन, राजेंद्र भोसले आणि नितीन सुर्वे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. जोशी आणि सौ कल्पना लहारे, पुणे स्थित महेंद्र मोगल, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी प्रा. किशोर लहारे यांचे अभिनंदन केले आहे. श्रीवर्धन शहरातील ज्येष्ठ पत्रकार, प्राचार्य, आनंद जोशी आणि श्री. केतन माळवदे यांनीही अभिनंदन केले आहे.

